# १

# आंतरराष्ट्रीय संघटना

**घटक रचना**


१.१ उद्दिष्टेये

१.२ प्रास्ताविक

१.३ विषय विवेचन

१.४ अर्थ

१.५ स्वरूप

१.६ व्याप्ती

१.७ उदय आणि महत्त्व

१.८ संयुक्त राष्ट्र संघटना

१.८.१ आमसभा

१.८.२ सुरक्षा परिषद

१.८.३ आर्थिक आणि सामाजिक परिषद

१.८.४ आंतरराष्ट्रीय न्यायालय

१.८.५ सचिवालय

१.८.६ विश्वस्त परिषद


## १.१ उद्दिष्टे

१. आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास करणे.

२. आंतरराष्ट्रीय संघटनेची भूमिका अभ्यासणे

३. आंतरराष्ट्रीय संस्थाचे कार्य अभ्यासणे

४. संयुक्त राष्ट्र संघटनेची कार्यपद्धती अभ्यासणे.

५. आंतरराष्ट्रीय संघटनेचे महत्व अभ्यासणे.

६. आंतरराष्ट्रीय संघटनेचे स्वरूप अभ्यासणे.

७. आंतरराष्ट्रीय संघटनेची व्याप्ती अभ्यासणे.

## १.२ प्रस्तावना

समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणात आंतरराष्ट्रीय संघटनेची भूमिका फार महत्त्वाचे आहे. या आंतरराष्ट्रीय संघटनेची व्याप्ती पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर मोठ्या प्रमाणावर

munotes.in

वाढलेली दिसते. पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेली राष्ट्रसंघ आणि दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेली संयुक्त राष्ट्र संघटना या संघटनेच्या कार्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता या संकल्पना यशस्वी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची फार महत्त्वपूर्ण भूमिका आहे. परंतु या आंतरराष्ट्रीय संघटनेची कल्पना विसाव्या शतकाच्या अगोदर काही वर्षापासूनच अस्तित्वात होती. अठराव्या शतकातच युरोपियन विचारवंत कांट, जेरेमी बेन्थम, रुसो यांनी वैश्विक संघटनांची आवश्यकता अधोरेखित केली होती. स्वातंत्र्य राष्ट्र राज्य आणि आपल्या सार्वभौमत्व मागे ठेवत जागतिक अधिसात्तेकडे आपले काही अधिकार सोपवले आहेत. आंतरराष्ट्रीय संघटना या विशिष्ट ध्येय ठेवून स्थापन झालेल्या असतात. ती ध्येय, हेतू पूर्ण करण्याचे कार्य या संघटना करत असतात. युद्धामुळे संस्कृती, मालमत्ता, मानवी जीवन आणि शांतता नष्ट होते. हे आपण जागतिक दोन महायुद्धात अनुभवले आहे परंतु पुढील पिढीचे भविष्य उज्वल शांततामय होण्यासाठी जागतिक संघटना फार महत्वाच्या असतात.

## १.३ विषय विवेचन

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास करणे खूपच आवशक आहे. समकालीन जागतिक राजकारणात या आंतरराष्ट्रीय संघटनांची भूमिका फार महत्वपूर्ण झाली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अनेक सत्तावादी द्रुष्टीकोनाने या आंतरराष्ट्रीय संघटनांचा जागतिक सत्तेतील वाट फार महत्वाचा आहे, हे सिद्ध करून दाखवले आहे. त्यामुळे या घटकामध्ये आंतरराष्ट्रीय संघटनांचा आर्थ, स्वरूप, व्याप्ती तसेच अत्यंत महत्वपूर्ण अशी आंतरराष्ट्रीय संघटना संयुक्त राष्ट्र संघटना रचना व कार्य याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## १.४ अर्थ

आंतरराष्ट्रीय संघटना हा शब्द आंतरराष्ट्रीय आणि संघटना दोन शब्दांपासून तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय म्हणजे राष्ट्रा-राष्ट्रा मधील आणि संघटना म्हणजे काही समान ध्येय गाठण्यासाठी संघटीत झालेला समूह होय. स्वतंत्र्य आणि सार्वभोम राज्याचा असा संघटित समूह की त्याचे सर्वस्व काही निर्धारित नियमासह काही निश्चित उद्देश्य प्राप्त करण्यासाठी ही सर्व राष्ट्र आप- आपसात सहकार्यासाठी तयार होतात त्या संघटनेला आंतरराष्ट्रीय संघटना असे म्हणतात.

**व्याख्या**

काही विशिष्ट ध्येय ठेवून अनेक राष्ट्राचा तयार झालेला संघ म्हणजे अंतरराष्ट्रीय संघटना होय. काही विचारवंतानी केलेल्या व्याख्या-

**चार्ल्स लर्ज यांच्या मते-**

“सामान्य उद्देशासाठी संघटित झालेल्या राज्याच्या औपचारिक म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना होय.”

**ईगलटन यांच्या मते-**

“विश्वशांती आणि कल्याण वृद्धीसाठी स्वातंत्र्य राज्याच्या संघटित औपचारिक समूह म्हणजे आंतरराष्ट्रीय संघटना होय.”

## १.५ स्वरूप

खालील मुद्द्याच्या आधारे आंतरराष्ट्रीय संघटनेचे स्वरूप सांगता येईल.

१. आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्य राष्ट्र किंवा राज्य असतात कोणतीही व्यक्ती सदस्य असत नाही.

२. सर्व सदस्य राज्यांना समान दर्जा आणि समान अधिकार असतात.

३. सदस्य राष्ट्रांकडून येणाऱ्या मागण्यांवर किंवा समस्यांवर चर्चा घडवून आणून निर्णय घेतले जातात.

४. सर्व सदस्य राज्य आंतरराष्ट्रीय संघटनेच्या नियमांशी आणि तत्वांशी बांधील असतात. कारण सर्व सदस्य राज्यांनी तशा करारांवर सह्या केलेल्या असतात.

५. विविध करारांच्या आधारे या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापना झालेल्या असतात.

६. या आंतरराष्ट्रीय संघटनेचे सदस्यत्व स्वीकारण्याचे किंवा बाहेर पडण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य राज्यांना असते.

७. या संघटनांचे एक मुख्यालय असते. आणि या मुख्यालयातून संघटनेचे कार्य चालत असते.

८. कार्य करण्याची विशिष्ट नियमावली असते. त्या आधारे या संघटना कार्य करत असतात.

९. विशिष्ट ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी या संघटना स्थापन झालेल्या असतात.

१०. सर्व सदस्य राज्य या संघटनांना अधिमान्यता बहाल करत असतात.

## १.६ व्याप्ती

दोन्ही जागतिक महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय संघटनाना फार महत्त्व प्राप्त झाले आहे. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्र संघ नावारूपाला आली १९२० साली वुड्रो विल्सन यांच्या १४ कलमी योजनेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली परंतु १९३९ ते १९४५ या कालावधीमध्ये दुसरे महायुद्ध घडून आले. यातून राष्ट्रसंघाचे अपयश दिसून आले. पहिल्या महायुद्धानंतर नाझीवाद आणि फाशीवाद या दोन हुकूमशाही विचारसारणी मुळे संपूर्ण जगाला दुसऱ्या महायुद्धापासून दूर राहता आले नाही. दुसऱ्या

महायुद्धानंतर जगाला तिसऱ्या महायुद्धापासून थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्य वाढवणे आवश्यक होते. आंतरराष्ट्रीय सर्व प्रश्न शांतता, सहकार्य आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवले जावेत त्यासाठी आंतरराष्ट्रीय नेतृत्वने प्रयत्न करून संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना केली दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाची परिस्थिती होती. परंतु या शीतयुद्धाचे महायुद्धत रूपांतर होऊ शकले नाही. हे एक संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्वपूर्ण यश आहे असे म्हणतात येईल. आंतरराष्ट्रीय सहकार्याचे मुद्दे, आंतरराष्ट्रीय करार, प्रादेशिक संघटना, जागतिक विकास कार्यक्रम, जागतिक पर्यावरण कार्यक्रम, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय सुरक्षा, हे आंतरराष्ट्रीय संघटनेच्या व्याप्तीचे भाग आहेत.

### १. आंतरराष्ट्रीय सहकार्य

आंतरराष्ट्रीय समस्या या सहकार्याच्या माध्यमातून सोडवल्या गेल्या पाहिजेत. या समस्या सोडवण्यात राष्ट्रा- राष्ट्रांमध्ये संघर्ष झाल्यास त्याचे रूपांतर युद्धामध्ये होऊ शकते त्यामुळे आंतरराष्ट्रीय संघटना या राष्ट्र- राष्ट्रांमधील समस्या सहकार्य आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. पर्यायाने युद्धाचे संकट टाळते.

### २. आंतरराष्ट्रीय करार

विविध आंतरराष्ट्रीय कराराच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील समस्या सोडवल्या जातात. हे करार विविध आंतरराष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून होत असतात. हे करार ज्या सदस्य राष्ट्रांनी मान्य केल्या आहेत. त्या सर्व सदस्य राष्ट्रांना या करारातील सर्व अटी शर्ती मान्य कराव्या लागतात. त्या आधारे आंतरराष्ट्रीय समस्या सोडवल्या जातात.

उदाहरण  निशस्त्रीकरण, शस्त्र नियंत्रण ,यासारखे करार.

### ३. प्रादेशिक संघटना

आंतरराष्ट्रीय संघटनेचा एक उपघटक प्रादेशिक संघटना असतात. या संघटना जगातील विशिष्ट प्रदेशाचे प्रतिनिधित्व करतात त्या विशिष्ट प्रदेशातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक समस्या वाटाघाटीच्या तसेच सहकार्याच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न करत असतात.

उदाः AAARC ,ASEAN यासारख्या संघटना प्रादेशिक संघटना म्हणून ओळखल्या जातात

### ४. जागतिक विकास कार्यक्रम

जागतिक स्तरावरील दारिद्र्य उपासमार मानवी हक्क यासारख्या समस्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समन्वयक UNDP या संस्थेच्या माध्यमातून सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी UNDP च्या समन्वयातून  सहस्त्रक विकास ध्येय आणि अलीकडे शाश्वत विकास ध्येय ठरवण्यात आले आहेत.

### ५. जागतिक पर्यावरण कार्यक्रम

जागतिक पातळीवरील औद्योगिक क्रांतीनंतर यांत्रिकरणामुळे उत्पादन निर्मितीमध्ये झपाट्याने वाढ झाली. या यांत्रिकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास फार मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या वाढत्या प्रदूषणामुळे तापमान वाढ, ओझोन थराचा क्षय अशा अनेक समस्या निर्माण झाल्यामुळे जागतिक पातळीवरील मनुष्य जीवनाला धोका निर्माण झाला आहे. मनुष्य जीवन आरोग्यदायी आणि सुरक्षित राहण्यासाठी हा पर्यावरण ऱ्हास थांबवण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या UNEP कार्यक्रमांतर्गत जागतिक पातळीवर विविध करार करण्यात आले आहेत.

उदाः क्योटो प्रोटोकॉल ,मटेरियल प्रोटोकॉल

**सारांशः**

अशाप्रकारे समकालीन जगामध्ये या आंतरराष्ट्रीय संघटनेची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विविध आंतरराष्ट्रीय समस्यांमुळे जागतिक स्तरावर अनेक क्षेत्रांमधील समस्या सोडवण्यासाठी विविध संघटनेच्या माध्यमातून विविध करार करणे. आणि त्याची अंमलबजावणी करून घेण्याचे कार्य या आंतरराष्ट्रीय संघटनेचे आहे.

## १.७ आंतरराष्ट्रीय संघटनाचा उदय

विसाव्या शतकामध्ये राष्ट्रसंघ आणि संयुक्त राष्ट्र संघटना स्थापन झाल्या असल्या तरी या आंतरराष्ट्रीय संघटनेचा उदय अठराव्या शतकाच्या अगोदर पासून असल्याचा दिसून येतो. आठव्या शतकात अनेक युरोपियन विचारवंतांनी वेगवेगळ्या स्वरूपाच्या जागतिक संघटना विषयी आपले विचार मांडले होते. स्वतंत्र राष्ट्र राज्यांनी आपल्या सार्वभौमत्वाला काही प्रमाणात मर्यादा घालून या जागतिक संघटनांना आधीसत्ता बहाल केली आहे. वेस्ट फेलिया करारानंतर जागतिक पातळीवर विविध परिषदाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय समस्या सोडवण्याला सुरुवात झाली. १८७४ मध्ये ब्रूसेल्स परिषदेच्या माध्यमातून युद्धाची काही नियमावली तयार करण्यात आली. १९०९ मधील हेग येथील युरोपीय राष्ट्रांनी भरवलेल्या या परिषदा या संघटनेच्या निर्मितीची अतिशय गतिशीलता प्राप्त झाली. विसाव्या शतकातील दोन महायुद्धाच्या संकटामुळे स्थापन झालेली राष्ट्रसंघ आणि संयुक्त राष्ट्र संघटना आणि त्यानंतर आंतरराष्ट्रीय राजकारण या आंतरराष्ट्रीय संघटनान भोवती फिरताना दिसते. अनेक सत्तावादी दृष्टिकोना चे पुरस्कर्ते विचारवंतानी या  आंतरराष्ट्रीय संघटनांना  अधिक महत्त्व प्राप्त करून दिले आहे. अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय संघटना ILO, WHO, IMF, WTO, UNDP, UNEP, FAO तसेच मोठ्या प्रमाणावर प्रादेशिक संघटना देखील स्थापन झाल्या आहेत. त्यामध्ये SAARC, ASEAN, यासारख्या संघटना आहेत.

**महत्वः**

समकालीन जगामध्ये विविध राष्ट्राप्रमाणेच या आंतरराष्ट्रीय संघटनेंना देखील महत्त्व प्राप्त झालेले आहे. अनेक सत्तावादी दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते विचारवंत या आंतरराष्ट्रीय संघटनेंना फार महत्त्व देतात. जागतिक सत्तेमध्ये या आंतरराष्ट्रीय संघटनेची देखील फार महत्त्वाची भूमिका आहे. असे हे विचारवंत अधोरेखित करतात.

munotes.in

### १. आंतरराष्ट्रीय शांतता

आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यामध्ये या आंतरराष्ट्रीय संघटनेची भूमिका फार महत्त्वाचे आहे. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ तर दुसऱ्या महायुद्धानंतर सयुक्त राष्ट्र संघटना UNO सारख्या संघटनेने आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. संपूर्ण जगाला तिसऱ्या महायुद्धापासून दूर ठेवण्यात UNO ला फार मोठे यश आले आहे. ज्या राष्ट्र मध्ये अशांतता निर्माण झाली आहे अशा राष्ट्रांमध्ये सयुक्त राष्ट्र संघटनेने शांती सेना पाठऊन शांतात प्रस्थापित करण्याचे कार्य केले आहे. आज पर्यंत अशा ४५ शांती सेनेच्य मोहिमा सयुक्त राष्ट्र संघटनेच्या माध्यमातून राबवण्यात आल्या आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करणे ही आंतरराष्ट्रीय संघटनेची फार महत्वपूर्ण भूमिका आहे .

### २. जागतिक सहकार्य वाढवणे

जागतिक सहकार्य वाढवण्यात आंतरराष्ट्रीय संघटनेचे फार महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे गेल्या काही दशकातील या संघटनेच्या वाटचालीतून दिसून येते. आणि जागतिक प्रश्न हे या संघटनेच्या माध्यमातून सहकार्य आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवण्यात आले आहे. राष्ट्र-राष्ट्रा मधील सहकार्य वाढवण्यासाठी मध्येस्थीचे कार्य या संघटनांनी केले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संघटनांनी जागतिक सहकार्य फार मोठी भर घेतली आहे

### ३. जागतिक सुरक्षेत वाढ

आंतरराष्ट्रीय संघटना मुळे पारंपारिक सुरक्षा त्याचबरोबर अपारंपारिक सुरक्षा ही ज्यामध्ये राज्यांची सुरक्षा (पारंपारिक सुरक्षा), मानवी सुरक्षा, दारिद्र्य, उपासमार, मानवी हक्कासारख्या (अपारंपारिक सुरक्षा) सुरक्षा मध्ये या आंतरराष्ट्रीय संघटनामुळे वाढ झाली आहे. त्यामुळे जागतिक सुरक्षेच्या दृष्टीने या संघटनेचे महत्त्व अनन्वय साधारण झाले आहे.

### ४. बालक आणि महिला सशक्तिकरण

बालक आणि महिला याच बरोबर अपंग, अल्पसंख्याक, निर्वासित यासारख्या दुर्बल घटकांना सशक्त करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. बालकाचे कुपोषण, महिला प्रस्तुती, महिला वरील अत्याचार यासारख्या समस्या सोडवण्यात या आंतरराष्ट्रीय संघटनेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण अशी आहे.

### ५. आंतरराष्ट्रीय समस्या सोडवणे

आंतरराष्ट्रीय संघटना जागतिक पातळीवरील दहशतवाद, पर्यावरण ऱ्हास, निर्वासित व्यक्तीच्या समस्या अशा अनेक जागतिक समस्या सोडवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात. त्यामुळे या आंतरराष्ट्रीय संघटनेंना फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

munotes.in

**सारांश**

आंतरराष्ट्रीय स्तरावरील दहशतवाद, पर्यावरण तसेच निर्वासित व्यक्तीच्या समस्या सोडवण्यासाठी मानवी हक्काच्या संरक्षना साठी, जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय प्रश्न सहकार्य आणि वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवणे तसेच दुर्बल घटकाच्या समस्या ज्यामध्ये बालके, महिला, अपंग, अल्पसंख्याक, उपासमार, बालमृत्यू, कुपोषण अशा समस्या सोडवण्याच्या दृष्टीने अलीकडच्या काळात या आंतरराष्ट्रीय संघटनेंना फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. आंतरराष्ट्रीय संघटनांची व्याप्ती स्पष्ट करा.

____________________
____________________
____________________
____________________

२. आंतरराष्ट्रीय संघटनेचे महत्त्व लिहा.

____________________
____________________
____________________
____________________

३. आंतरराष्ट्रीय संघटनेचे स्वरूप लिहा

____________________
____________________
____________________
____________________

## १.८ संयुक्त राष्ट्र संघटना UNO (United Nations Organization)

२४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापणे वेळी संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या ५१ एवढी होती. २०२२साली या संघटनेची सदस्य संख्या १९३ सदस्य पर्यंत एवढी वाढली आहे. तसेच काही राष्ट्रांना निरक्षक सदस्यांच्या दर्जा देण्यात आला आहे. अलीकडे तेवान राष्ट्र UNO (United Nations Organization) च्या सदस्यत्वासाठी प्रयत्नशील आहे. ज्याला चीनचा विरोध आहे. अलीकडे जवळपास जगातील सर्व राष्ट्र ही UNO ची सदस्य झाली आहेत. जागतिक स्तरावर सर्व राष्ट्रांना UNO चे सदस्यत्व मिळाल्यास आपण सर्व सार्वभोम राष्ट्र आहोत अशी भावना राष्ट्रांमध्ये निर्माण झाली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व मिळवण्यासाठी तसा अर्ज संबंधित राष्ट्रांनी UNO च्या महासचिवाकडे करणे आवश्यक असते. त्यानंतर UNO च्या सुरक्षा परिषदेतील १५ सदस्यांपैकी किमान ९ सदस्यांनी मान्यता देणे आवश्यक असते. त्यानंतर आमसभेतील एकूण सदस्य संख्येच्या दोन तृतीयांश बहुमत मिळाल्यानंतर UNO कडून एक पत्र काढले जाते. त्यामध्ये केव्हापासून तो देश UNO चा सदस्य असेल ती तारीख नमूद करण्यात येते.

munotes.in

**संयुक्त राष्ट्र संघटनेची उद्दिष्टे**

१) जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करणे.

२) जागतिक स्तरावरील सर्व राष्ट्रांचे संरक्षण करणे.

३) राष्ट्रा- राष्ट्रांमधील संघर्षामध्ये मध्यस्थिती करून ते संघर्ष शांततेच्या माध्यमातून सोडवणे.

४) जागतिक स्तरावर मानव अधिकाराचे संरक्षण करणे.

**संयुक्त राष्ट्र संघटनेची कार्य**

१) मानव अधिकाराचे रक्षण करणे.

२) जागतिक स्तरावर पर्यावरणाचे संरक्षण करणे.

३) आंतरराष्ट्रीय संघर्ष शांतता आणि सहकार्याच्या तसेच वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवणे.

४) जागतिक विकासासाठी प्रयत्न करणे.

५) जागतिक दुर्बल घटकाचे सबलीकरण करणे.

६) महिला व बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे.

७) दारिद्र्य व उपासमाराच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करणे.

८) शांती सेनेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पेच सोडवणे.

९) सदस्य राष्ट्राच्या सार्वभौमत्वाचे संरक्षण करणे.

१०) आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण करणे.

११) शाश्वत विकास साध्य करणे.

**संयुक्त राष्ट्र संघटनेची रचना**

संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्य एकूण सहा संस्थांच्या माध्यमातून चालवले जाते त्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेची अंगे संबोधले जाते. ही सहा अंगे UNO ची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करतात.

**१) आमसभा (General Assembly)**

आमसभा ही संयुक्त राष्ट्र संघटनेचे कायदेमंडळ म्हणून ओळखली जाते. यामध्ये सर्व सदस्य राष्ट्र आपली जास्तीत जास्त पाच प्रतिनिधी पाठवू शकतात. प्रत्येक राष्ट्रासाठी एक मत असते. कोणताही महत्त्वाचा निर्णय ऐकून सदस्य संख्येच्या दोन तृतीयांश (२/३) बहुमताने घेतला जातो. उदा. एखाद्या राष्ट्रास UNO चे सदस्यत्व बहाल करावयाचे असल्यास आमसभेच्या ऐकून सदस्य संखेच्या दोन तृतीयांश (२/३) बहुमत असणे आवश्यक असते. तेव्हाच त्या संबंधित राष्ट्राला संयुक्त राष्ट्र संघटनेचे सदस्यत्व मिळत असते. अशा प्रकारे महत्त्वाच्या निर्णयांना आमसभेची मान्यता

आवश्यक असल्याकारणाने आमसभा ही UNO चे महत्वपूर्ण अंग म्हणून ओळखली जाते. UNO चे सर्व सदस्य राष्ट्र हे आमसभेचे सदस्य असतात.

**कार्य :-**

१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अंदाजपत्रकाला मान्यता देणे.

२) आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करणे.

३) नवीन राष्ट्रस सदस्यत्व देणे.

४) महासचिवाची निवड करणे.

५) सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्यांची निवड करणे.

६) आर्थिक आणि सामाजिक परिषदेच्या सदस्यांची निवड करणे.

## २) सुरक्षा परिषद :-

सुरक्षा परिषदेला संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्यकारी मंडळ म्हणून ओळखले जाते. सुरक्षा परिषदेची एकूण सदस्य संख्या १५ एवढी आहे. त्यापैकी पाच सदस्य हे स्थायी सदस्य आहेत. त्यापैकी अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स आणि चीन ही स्थायी सदस्य आहेत. तर दहा सदस्य हे अस्थायी सदस्य असतात. अस्थायी सदस्यांचा कार्यकाळ दोन वर्षाचा असतो. जागतिक स्तरावर शांतता आणि सुरक्षता प्रस्थापित करण्यासाठी सुरक्षा परिषदेचे महत्त्व अनन्य साधारण आहे. कायम (स्थायी) सदस्यांना व्हेटो पावर (नकाराधिकार) देण्यात आला आहे. या पाच स्थायी सद्स्यापेकी कोणत्याही एका सदस्याने हा व्हेटो पावर (नकाराधिकार) वापरल्यास तो प्रस्ताव मंजूर होत नाही. मागील ७० वर्षाच्या इतिहासात या नकाराधिकाराचा वापर सर्वच कायम सदस्यांनी राजकीय हेतूने वापरला आहे. त्यामुळे सुरक्षा परिषदेच्या सदस्य संख्येत वाढ करावी अशी मागणी आंतरराष्ट्रीय पातळीवरून केली जात आहे. भारत, जर्मनी, जपान आणि ब्राझील या राष्ट्रांनी UNO च्या सुरक्षा परिषदेचे कायम स्थायी सदस्यत्व मिळण्यासाठी जी४ (G४) हा गट स्थापन केला आहे. यामुळे सुरक्षा परिषदेचे महत्त्व UNO मध्ये फार महत्त्वपूर्ण झाल्याचे दिसून येते.

**कार्य :-**

१) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे. हे सुरक्षा परिषदेचे मुख्य कार्य आहे.

२) आमसभेला महासचिवाच्या नावाची सुरक्षा करणे

३) एखाद्या राष्ट्राला सदस्यत्व देणे किंवा काढून घेण्याची शिफारस आमसभेला करणे.

४) आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधीशाच्या निवडीसाठी आमसभेत सहभागी होणे.

५) एखाद्या राष्ट्रांमधील शांतता प्रश्न विषयी शोध घेणे

### ३) आर्थिक आणि सामाजिक परिषद :-

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सनदे नुसार १९४६ साली या परिषदेची स्थापना करण्यात आली. सध्या या परिषदेची ५४ राष्ट्र सदस्य आहेत. सदस्याचा कार्यकाळ तीन वर्षाचा असतो. दर तीन वर्षांनी एक तृतीयांश (१/३) सदस्य निवृत्त होतात व तेवढेच नव्याने नियुक्त केले जातात. सदस्याची निवड आमसभेच्या माध्यमातून केली जाते. आर्थिक आणि सामाजिक परिषदेचे मुख्य ध्येय मानवी हक्क आणि स्वातंत्र्य प्रस्थापित करणे हे आहे. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील आर्थिक, सामाजिक, आरोग्य, सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रश्न सोडवणे हे प्रमुख कार्य आहे.

**कार्य :-**

१) आंतरराष्ट्रीय स्तरावर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक प्रश्नाविषयी परिषद भरवणे.

२) सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्य प्रश्नाविषयी अभ्यास करून त्यांचा अहवाल UNO ला सादर करणे.

३) आर्थिक, सामाजिक, आरोग्य या प्रश्ना सोडवणे विषयाची शिफारसी आमसभेला करणे.

४) वरील सर्व प्रश्न सोडवण्यासाठी समन्वयक संस्था म्हणून कार्य करणे.

### ४) आंतरराष्ट्रीय न्यायालय :-

आंतरराष्ट्रीय न्यायालय हे UNO चे आंतरराष्ट्रीय न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे सर्व सदस्य हे आंतरराष्ट्रीय न्यायालयाची सदस्य राष्ट्र असतात. आंतरराष्ट्रीय न्यायालयाच्या स्थापनेचा मसुदा सेंनफ्रान्सिसको परिषदेत तयार करण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे मुख्यालय नेदरलँड देशातील हेग या शहरात आहे. या न्यायालयात एकूण १५ न्यायाधीश असतात. त्यांची निवड नऊ वर्षांसाठी आमसभेच्या माध्यमातून केली जाते. सर्व न्यायाधीश बहुमताने निर्णय घेतात. दोन सार्वभौम राष्ट्र मधील संघर्षाच्या मुद्द्यावर निर्णय देणे. तसेच आमसभा आणि सुरक्षा परिषदेला न्याय विषयक सल्ला देण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे असते.

### ५) सचिवालय :-

सचिवालय हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे प्रशासकीय अंग आहे. या प्रशासकीय संस्थेचे प्रमुख म्हणून महासचिव कार्य करत असतात. महासचिवाची निवड आमसभा सुरक्षा परिषदेच्या सल्ल्यानुसार पाच वर्षासाठी करते. महासचिव पुनर निवडीसाठी पात्र असतात. संयुक्त राष्ट्र संघटनेचे सचिवालय अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे स्थापन करण्यात आले आहे. महासचिव UNO च्या सर्व संस्थांमध्ये समन्वय साधण्याचे कार्य करत असतात. ते सचिवालयाचे प्रमुख असतात. कार्यालयीन कामकाजासाठी त्यांच्या मदतीसाठी आठ सचिव असतात. संयुक्त राष्ट्र संघटनेचा प्रस्ताव आणि अहवाल तयार करण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महासचिव काम करते.

**कार्य :-**

१) सचिवालयाचा कर्मचारी वर्ग निवडणे.

२) आमसभेला वार्षिक अहवाल सादर करणे.

३) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व अंग (संस्थाचे) सचिव म्हणून कार्य करणे.

४) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्यासाठी एखाद्या प्रश्नाकडे सुरक्षा परिषदेचे लक्ष आकर्षित करणे.

### ६) विश्वस्त परिषद :-

विश्वस्त परिषदेची स्थापना जगातील काही विशेष भौगोलिक क्षेत्राच्या विकासासाठी करण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर सयुक्त राष्ट्र संघटनेकडे काही अविकसित प्रदेशातील मानवी विकासासाठी हे प्रदेश स्वप्नात आले होते. या प्रदेशामधील मानवी विकासाच्या दृष्टीने एक विश्वस्त परिषद स्थापन करण्यात आली होती. त्या भोगोलिक प्रदेशातील लोक या परिषदेवर सदस्य असत. या परिषदेकडे आशी अकरा विश्वस्त प्रदेश सोपवण्यात आले होते. सध्या या प्रदेशाचा विकास होऊन ती सार्वभौम राष्ट्र निर्माण झाली आहेत. त्यामुळे १९९४ साली ही विश्वस्त परिषद विसर्जित करण्यात आली आहे.

### सारांश :-

अशा प्रकारे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अंगानी (संस्थांनी) मागील ७० वर्षांमध्ये जागतिक शांतता आणि संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असे कार्य केले आहे. सध्या विश्वस्त परिषद हे संयुक्त राष्ट्र संघटनेचे अंग नाही. त्यामुळे सध्या आमसभा, सुरक्षा परिषदा, आर्थिक आणि सामाजिक परिषद, आंतरराष्ट्रीय न्यायालय, सचिवालय ही पाच अंगे कार्यरत आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ७० वर्षाच्या इतिहासात शांतता आणि सुरक्षेच्या माध्यमातून जगाला तिसऱ्या महायुद्धापासून दूर ठेवण्यात यश आले आहे.

### आपली प्रगती तपासा

१. आमसेभीची कार्य व रचना स्पष्ट करा.

___

___

___

___

२. संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्य स्पष्ट करा.

___

___

___

___

३. आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे कार्य व रचना स्पष्ट करा.

**अधिक वाचण्यासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ सूची**

१) आंतरराष्ट्रीय संबंध - अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे.

२) समकालीन जागतिक राजकारण – डॉ. शैलेन्द्र देवळाणकर.

३) आंतरराष्ट्रीय संबंध – पियु घोष.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाचे सिद्धांत- डॉ. प्रशांत अमृतकर

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

२

# संयुक्त राष्ट्र आणि सुरक्षा समस्या

**घटक रचना**


२.१ उद्दिष्टे

२.२ प्रास्ताविक

२.३ विषय विवेचन

२.३.१ विवादांचे पॅसिफिक सेटलमेंट

२.३.२ पॅसिफिक विवादांच्या निराकरणाबाबत सुरक्षा परिषदेचा निर्णय

२.३.३ यूएन ऑपरेशनल कमांड अंतर्गत सैन्याची कार्ये

२.४ अणु तंत्रज्ञानाचे नियमन आणि नियंत्रण


## २.१ उद्दिष्टे

" संयुक्त राष्ट्र आणि सुरक्षा समस्या" या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला पुढील बाबी समजून घेण्यास मदत होईल.

१. संयुक्त राष्ट्राच्या माध्यमातून जगात शांतता आणि सुरक्षा प्रस्थापित करण्यासाठी निर्माण केलेल्या विविध यंत्रणेचे स्वरूप समजून सांगता येईल.

२. अणु तंत्रज्ञानाचे नियमन आणि नियंत्रणाचे स्वरूप समजावून सांगता येईल.

३. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाच्या भूमिका सांगता येतील.

## २.२ प्रास्ताविक:

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाचा (१९१४-१९१८ आणि १९३९-१९४५) अभ्यास केल्याशिवाय आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास अपुरा आहे. (१९१४-१९१८ आणि १९३९-१९४५) या युद्धांमुळे केवळ हजारो लोकांचा मृत्यू झाला नाही तर मानवी जीवनाचा प्रत्येक पैलू बदलला, या युद्धांनी जागतिक धोरणकर्त्यांना विचार करण्यास भाग पाडले. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर लगेचच १९२० मध्ये लीग ऑफ नेशन्सची स्थापना झाली, परंतु ही संघटना दुसऱ्या महायुद्धाला रोखण्यात अपयशी ठरली आणि लीग ऑफ नेशन्सची विश्वासार्हता धोक्यात आली. शेवटी १९४६ मध्ये लीग ऑफ नेशन्स कोसळली कारण यूएसएसह प्रमुख शक्ती त्यात सामील होण्यास नाखूष होत्या. दुसऱ्या महायुद्धाने सन १९४५ मध्ये जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबॉम्बचा वापर करून पुन्हा आपत्ती ओढवली, अणुयुगात शांततेची गरज ओळखून ५० देशांचे प्रतिनिधी सॅन येथील आंतरराष्ट्रीय संघटनेच्या परिषदेत २५ एप्रिल ते २६ जून १९४५ पर्यंत जमले होते. तसेच संयुक्त राष्ट्र चार्टर तयार करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या सनदेने सामान्यतः संयुक्त राष्ट्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीन आंतरराष्ट्रीय संघटनेला जन्म दिला ज्याचा

मुख्य उद्देश भूतकाळातील नवीन युद्धांना प्रतिबंधित करणे हा होता. चीन, फ्रान्स, सोव्हिएत युनियन, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स आणि बहुसंख्य स्वाक्षरीदारांनी सनद मंजूर केल्यानंतर संयुक्त राष्ट्राची अधिकृतपणे २४ ऑक्टोबर १९४५ रोजी सुरुवात झाली. ही एकमेव आंतरराष्ट्रीय संस्था आहे जी गेल्या ७७ वर्षांपासून यशस्वीपणे कार्यरत आहे. यूएनचे मुख्य लक्ष शांतता, सुरक्षा यावर राहिले आणि आंतरराष्ट्रीय विवादांचे सौहार्दपूर्ण निराकरण करण्यासाठी, यूएन ने अतिरिक्त काम सुरू केले आहे ज्याची मूलतः यूएन चार्टरमध्ये कल्पना नाही. आपल्या सर्वांसाठी एक चांगले आणि अधिक शाश्वत भविष्य साध्य करण्यासाठी त्याने २०३० साठी शाश्वत विकासाची उद्दिष्टे निश्चित केली आहेत. यूएन नवीन युद्धाच्या शक्यतेशी तितकेच चिंतित आहे त्यामुळे "युद्धाच्या अरिष्टापासून पुढील पिढ्यांना वाचवण्यासाठी" हे चार्टरच्या प्रस्तावनेतील पहिले शब्द आहेत आणि हे शब्द संयुक्त राष्ट्रांच्या निर्मितीसाठी मुख्य प्रेरणा होते. अनेक प्रसंगी यूएन ने विवादांना युद्धात वाढ होण्यापासून रोखण्यासाठी किंवा सशस्त्र संघर्षाच्या उद्रेकानंतर शांतता पुनर्संचयित करण्यात मदत करण्यासाठी आणि युद्धातून उदयास आलेल्या समाजांमध्ये चिरस्थायी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आवाहन केले. यूएन ने या जबाबदाऱ्या विविध महत्त्वपूर्ण  ऑपरेशन्स तसेच कायदे आणि नियमांद्वारे पार पाडल्या. जागतिक शांतता राखण्यासाठी यूएन चे पहिले महत्वाचे अंग सुरक्षा परिषद (यूएनSC) म्हणून ओळखले जाते, यूएन चार्टर स्पेसिफिकेशन्स  आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखणे ही सुरक्षा परिषदेची प्राथमिक जबाबदारी आहे. तथापि, शांतता राखण्याचे कार्य कोठे आणि केव्हा  केले जावे हे सुरक्षा परिषदेवर अवलंबून आहे. संघर्षग्रस्त प्रदेशात शांतता मोहिमा पाठवणे ही सुरक्षा परिषदेची प्राथमिक जबाबदारी आहे. याशिवाय, सुरक्षा परिषद संयुक्त राष्ट्रांच्या शांतता ऑपरेशन्सच्या कार्यावर सतत लक्ष ठेवते. ज्यामध्ये महासचिवांच्या नियतकालिक अहवालांद्वारे आणि विशिष्ट ऑपरेशन्सच्या कामावर चर्चा करण्यासाठी समर्पित सुरक्षा परिषद सत्रे आयोजित करणे समाविष्ट आहे. मिशनच्या आदेशाला योग्य वाटेल म्हणून मतदान करण्याचा, वाढवण्याचा, सुधारणा करण्याचा किंवा समाप्त करण्याचा अधिकार आहे.

## २.३ विषय विवेचन:

चार्टरच्या अनुच्छेद २५ नुसार यूएन चे सर्व सदस्य सुरक्षा परिषदेचे निर्णय स्वीकारण्यास आणि अंमलात आणण्यास सहमत आहेत. केवळ सुरक्षा परिषदेला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. ज्याची अंमलबजावणी सर्व सदस्य राष्ट्रे करण्यास बांधील आहेत. हे साध्य करण्यासाठी यूएन सनद शांतता, स्थिरता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी विविध मार्ग निर्दिष्ट करते, हे साध्य करण्यासाठी शांतता राखण्यासाठी, सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन युद्ध रोखण्यासाठी यूएन अस्तित्वात आहे. यूएन चार्टरमधील आंतरराष्ट्रीय विवादांचे पॅसिफिक सेटलमेंट म्हणून ओळखले जाते. पक्षांमधील मतभेदांमुळे विवाद उद्भवतात, हे मतभेद वस्तुस्थिती, नकार, दावे आणि प्रतिदावे किंवा इतरांद्वारे नकार यामधून उद्भवतात. जेव्हा जेव्हा असे मतभेद जगाच्या विविध भागांतील सरकार, संस्था,खाजगी व्यक्ती यांचा समावेश होतो तेव्हा आंतरराष्ट्रीय विवाद अस्तित्वात असल्याचे म्हटले जाते. पुढे विवाद विशिष्ट असणे आवश्यक आहे; याचा अर्थ असा आहे की त्यात वाजवीपणे परिभाषित विषय असणे आवश्यक आहे, जेणेकरुन कमीतकमी नाममात्र, विवाद कशाबद्दल आहे हे सांगता येईल. यात परस्परविरोधी दावे आणि प्रतिपादने देखील समाविष्ट असणे आवश्यक आहे.पॅसिफिक सेटलमेंट ऑफ डिस्प्युट्स म्हणजे अशा यंत्रणेचा संदर्भ आहे

ज्याद्वारे सर्व सदस्य त्यांचे आंतरराष्ट्रीय विवाद शांततापूर्ण मार्गाने अशा प्रकारे सोडवतील की आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा आणि न्याय धोक्यात येणार नाही. यूएन चार्टरचा अध्याय VI पॅसिफिक सेटलमेंट ऑफ डिस्प्युट्सशी संबंधित आहे (कलम ३३-३८)

### २.३.१ विवादांचे पॅसिफिक सेटलमेंट: (अध्याय VI- कला. ३३-३८)

आंतरराष्ट्रीय विवादांच्या पॅसिफिक सेटलमेंटशी संबंधित महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत:

प्रकरण VI च्या कलम ३३ मध्ये असे म्हटले आहे की आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी धोक्यात येण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही विवादास प्रथम वाटाघाटी, मध्यस्थी किंवा इतर शांततापूर्ण मार्गांनी संबोधित केले जावे आणि असे म्हटले आहे की परिषद पक्षांना अशा मार्गांचा वापर करण्यास सांगू शकते.

प्रकरणाचा कलम ३४ तपास आणि तथ्य शोधण्याशी संबंधित आहे, हा लेख सुरक्षा परिषदेला कोणत्याही विवादाची किंवा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा धोक्यात आणणारी कोणतीही परिस्थिती तपासण्याचा अधिकार देतो. तसेच सुरक्षा परिषदेने अनिवार्य केलेल्या तपास आणि तथ्य शोध मोहिमेचा समावेश करते.सनदेच्या ३४ मध्ये सेक्रेटरी-जनरल द्वारे तथ्य शोध मोहिमेचा देखील विचार केला जातो ज्यांना कौन्सिलने आपला पाठिंबा व्यक्त केला किंवा ज्याची त्याने दखल घेतली.

कलम ३५, ११ आणि ९९-विवाद आणि परिस्थितींचा संदर्भ सुरक्षा परिषदेकडे, हा लेख सदस्य आणि सदस्य नसलेल्या दोन्ही देशांना कोणताही वाद, किंवा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणणारी कोणतीही परिस्थिती त्यांच्या लक्ष वेधून घेण्याचा अधिकार देतो. या विभागात कलम ३५ च्या तरतुदींनुसार राज्यांनी विवाद किंवा परिस्थिती सुरक्षा परिषदेच्या निदर्शनास आणून दिलेली प्रकरणे समाविष्ट आहेत.

सन १९८९ नंतर, सेक्रेटरी-जनरल आणि जनरल असेंब्ली यांनी अनुक्रमे चार्टरच्या कलम ९९ आणि अनुच्छेद ११ (३) च्या संदर्भात नवीन विवाद आणि परिस्थिती सुरक्षा परिषदेच्या लक्षात आणून दिल्याची उदाहरणे देखील या विभागात समाविष्ट आहेत.

कलम ३६-३८ आणि भाग VI सामान्यत: पक्षांना शिफारशी चार्टरचे हे लेख आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता धोक्यात आणू शकणाऱ्या विवादांच्या शांततापूर्ण निराकरणासाठी शिफारशी करण्यासाठी सुरक्षा परिषदेचे अधिकार आणि मर्यादा समाविष्ट करतात. हे सामान्यतः अनिवार्य उपाय मानले जात नाहीत जे चार्टरच्या अध्याय VII अंतर्गत येतात. या विभागात विवाद किंवा परिस्थिती विचारात घेण्यासाठी सुरक्षा परिषदेची क्षमता आणि सनदेच्या अध्याय VI च्या चौकटीत योग्य शिफारशी करण्याची शक्ती यासंबंधी चर्चा समाविष्ट आहे.

### २.३.२ पॅसिफिक विवादांच्या निराकरणाबाबत सुरक्षा परिषदेचा निर्णय:

चार्टरच्या सहाव्या प्रकरणामध्ये विविध तरतुदी आहेत (कलम ३३ (२), ३६ (१), ३७ (२) आणि ३८ ज्यानुसार सुरक्षा परिषद विवादांच्या पॅसिफिक सेटलमेंटबाबत शिफारसी करू

शकते. हा विभाग वापराचे विहंगावलोकन प्रदान करतो. या तरतुदींपैकी विशेषत: विवादातील पक्षांना सुरक्षा परिषदेच्या शिफारशी तसेच विवादांच्या पॅसिफिक सेटलमेंटमध्ये महासचिवांच्या चांगल्या कार्यालयांना विनंती करणारे परिषद निर्णय स्पष्ट करते.

## १. युनायटेड नेशन्स पीस किपिंग ऑपरेशन्स: (शांतता अभियान)

जगातील शांतता आणि सुरक्षितता पुनर्संचयित करण्यासाठी ही दुसरी पद्धत आहे, शांतता राखण्याच्या ऑपरेशन्सचा वापर जगाच्या विविध भागांमध्ये संयुक्त राष्ट्राद्वारे मोठ्या प्रमाणावर केला जातो.पीसकीपिंग ऑपरेशन्समध्ये चिरस्थायी शांततेसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याच्या उद्देशाने क्रियाकलापांचा समावेश होतो. या विषयावर केलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की शांतता राखण्यामुळे नागरिक आणि युद्धक्षेत्रातील मृत्यू कमी होतात, तसेच नवीन युद्धाचा धोका कमी होतो.पीसकीपिंग ऑपरेशन्स दरम्यान, शांतीरक्षक नागरिकांचे संरक्षण करतात, सक्रियपणे संघर्ष रोखतात, हिंसा कमी करतात, सुरक्षा मजबूत करतात आणि राष्ट्रीय अधिकार्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी सक्षम करतात.यासाठी राजकीय रणनीतीला समर्थन देणारी सुसंगत सुरक्षा आणि शांतता निर्माण धोरण आवश्यक आहे. यूएन शांती रक्षणाची स्थापना १९४५ मध्ये झाली. त्या अंतर्गत कार्यरत सक्रिय व्यक्ती सुमारे ८१,८२० आहेत आणि त्याचे बजेट अंदाजे $६.७ अब्ज आहे. संयुक्त राष्ट्रांची सनद सुरक्षा परिषदेला आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी सामूहिक कृती करण्याचा अधिकार आणि जबाबदारी देते. तंतोतंत सांगायचे तर, यूएन द्वारे शांतता ऑपरेशन्स ही शांतता ऑपरेशन्स विभागाची भूमिका आहे जी संघटनेने चिरस्थायी शांततेसाठी परिस्थिती निर्माण करण्यासाठी संघर्षामुळे भरकटलेल्या देशांना मदत करण्याचा एक मार्ग म्हणून विकसित केलेले साधन आहे. शांतता निर्माण करणे आणि शांतता अंमलबजावणी करणे यापेक्षा ते वेगळे आहे तथापि यूएन हे मान्य करत नाही की सर्व क्रियाकलाप परस्पर बळकट करत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या शांतता पाळण्याच्या ऑपरेशन्सच्या चार श्रेणी आहेत जसे की

### १) देखरेख आणि निरीक्षक मिशन:

हे भांडवलदारांची संमती आहे आणि शांतता रक्षकांचा समावेश आहे जे कोणत्याही युद्धविराम उल्लंघनाचे निरीक्षण करतात आणि अहवाल देतात.

### २) पारंपारिक शांतता राखणे:

शत्रुत्वाचा अंत करण्यासाठी आणि संघर्षाच्या क्षेत्रात शांतता राखण्यासाठी हलके सशस्त्र दल आणि पोलिसांच्या कृतींचा समावेश होतो, पारंपारिक शांतता रक्षकांमध्ये नि:शस्त्रीकरण, विद्रोह आणि बंडखोर सैन्याचे पुनर्मिलन यांचा समावेश असू शकतो

### ३) शांतता निर्माण:

शांततारक्षक दल मानवतावादी मदत पुरवणे किंवा संस्थांची पुनर्बांधणी करणे, अनेकदा शांतता निर्माण करण्यासाठी राष्ट्र उभारणीसाठी दीर्घकालीन वचनबद्धता

आवश्यक असते, ज्यामध्ये कृती मुक्त निवडणुका, कायद्याचे राज्य आणि न्यायिक आणि विधान शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न करतात.

**४) शांतता अंमलबजावणी:**

यात युद्ध करणाऱ्या बाजूंमधील शत्रुत्व संपवण्यासाठी लष्करी बळाचा वापर करणे समाविष्ट आहे, जसे की हैती, बोस्निया मधील यूएन आणि गैर-यूएन मिशन इ. शांतता राखण्याच्या मिशनचे तीन आणि आच्छादित टप्पे आहेत जसे की स्टार्ट-अप स्टेज, आदेशाची अंमलबजावणी आणि नंतर मिशन हस्तांतरित करणे आणि पैसे काढणे.

### २.३.३ यूएन ऑपरेशनल कमांड अंतर्गत सैन्याची कार्ये:

शांतता आणि सुरक्षितता पुनर्संचयित करण्यासाठी यूएन द्वारे जगभरात ६१ हून अधिक शांतता राखण्याचे ऑपरेशन केले आहेत.

यूएन द्वारे काही महत्त्वाच्या शांतता राखण्याच्या कार्यांची यादी खालीलप्रमाणे आहे

१. काँगोमध्ये संयुक्त राष्ट्रांचे ऑपरेशन (ONUC)- १९६०-६४
२. मोझांबिकमध्ये संयुक्त राष्ट्रांचे ऑपरेशन (ONUMOZ)- १९९२-९४
३. सोमालियामध्ये संयुक्त राष्ट्रांचे ऑपरेशन –I (यूएनOSOM-I)- १९९२-९३
४. युनायटेड नेशन्स ऑपरेशन इन लायबेरिया (यूएनOMIL)- १९९३-९७
५. युगांडा-रवांडा (यूएनOMUR)- १९९३-९४ मध्ये यूएन निरीक्षक मोहीम
६. सिएरा लिओन (यूएनOMSIL)- १९९८-१९९९ मध्ये यूएन निरीक्षक मिशन
७. कोटे डी'आयव्होर (यूएनOCI)-२००४-१७ मध्ये संयुक्त राष्ट्रांचे ऑपरेशन
८. युनायटेड नेशन/आफ्रिकन युनियन मिशन इन डार्फर (यूएनAMID)- २००७-२०२०

ही काही महत्त्वाची मिशन आहेत जी यूएन ने पार पाडली आहेत; तथापि युनायटेड नेशन्स अंतर्गत काही वर्तमान मिशन सक्रिय आहेत:

१. युनायटेड नेशन्स मिशन इन रिपब्लिक ऑफ साउथ सुदान (यूएनMISS)- २०११
२. मध्य आफ्रिकन रिपब्लिक (MINUSCA)- २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्र बहुआयामी एकात्मिक स्थिरीकरण मिशन
३. सायप्रसमधील संयुक्त राष्ट्र शांती सेना (यूएनFICYP)-१९६४.

**सारांश:**

संयुक्त राष्ट्रांने गेल्या काही वर्षांपासून, युद्ध आणि सशस्त्र संघर्षाचे प्रमाण जगभरातील अनेक देशांनी त्यांच्या राष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक विकासाला प्राधान्य देत कमी केले आहे. तथापि, युद्ध आणि अंतर्गत आक्रमणाची शक्यता आजही पूर्णपणे नाकारता येत नाही कारण बऱ्याच प्रकरणांमध्ये यूएन शांती सेना अजूनही कार्यरत असून काम करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या पायावर जगाची शांतता आणि सुरक्षा कायम राहिली आणि संयुक्त राष्ट्रांच्या

munotes.in

निर्णय प्रक्रियेत सुरक्षा चिंता ही प्रमुख समस्या आहे. यूएन शांतता राखणे संघर्षामुळे भरकटलेल्या देशांना चिरस्थायी शांततेसाठी परिस्थिती निर्माण करण्यास मदत करते.यजमान देशांना संघर्षातून शांततेकडे जाण्यासाठी कठीण मार्गावर नेव्हिगेट करण्यात मदत करण्यासाठी शांतता राखणे हे यूएन कडे उपलब्ध असलेल्या सर्वात प्रभावी साधनांपैकी एक असल्याचे सिद्ध झाले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. पॅसिफिक विवादांच्या निराकरणाबाबत सुरक्षा परिषदेचा निर्णयाची चर्चा करा.

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

______________________________________________________________

## २.४ अणु तंत्रज्ञानाचे नियमन आणि नियंत्रण:

अणुऊर्जेची कल्पना १९३० च्या दशकात सुरू झाली, जेव्हा भौतिकशास्त्रज्ञ एनरिको फर्मी यांनी पहिल्यांदा दाखवले की न्यूट्रॉन अणूंचे विभाजन करू शकतात. २० डिसेंबर १९५१ रोजी आर्को, इडाहो जवळील EBR-I प्रायोगिक स्टेशनवर अणुभट्टीद्वारे प्रथम वीज निर्माण करण्यात आली ज्याने सुरुवातीला सुमारे १०० KW उत्पादन केले. तथापि, अणु तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ शांततापूर्ण उद्देशांसाठी जसे की एक्स-रे, कर्करोग उपचार, वीज आणि इतर विकास प्रकल्पांसाठी केला जात नाही तर ते अण्वस्त्रे तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते जे मानवी संस्कृती नष्ट करण्यास सक्षम पृथ्वीवरील सर्वात घातक शस्त्रे म्हणून ओळखले जातात. १९४५ मध्ये जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या ठिकाणी पहिला अणुबॉम्ब टाकण्यात आला आणि हिरोशिमामध्ये एकूण १३५,००० आणि नागासाकीमध्ये ६४००० लोक मारले गेले, तेव्हापासून अण्वस्त्रांचा प्रसार आणि वापराविरुद्धच्या जागतिक हालचालींनी अण्वस्त्रे नष्ट करण्याचे त्यांचे प्रयत्न तीव्र केले आहेत.

विविध संस्था आणि स्वयंसेवी संस्था अण्वस्त्रांच्या निर्मूलनासाठी लढा देत आहेत. खरे तर, अणु तंत्रज्ञानाचा सामाजिक-आर्थिक विकासासाठी अनेक फायदे असल्यामुळे त्यावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही. अणुऊर्जेच्या शांततापूर्ण वापरासाठी अमेरिकेचे अध्यक्ष ड्वाइट डी. आयझेनहॉवर यांनी १९५३ मध्ये यूएन जनरल असेंब्लीमध्ये केलेल्या भाषणादरम्यान "शांततेसाठी अणू" या नावाने एक अभिनव कार्यक्रम सुरू केला होता ज्याचा उद्देश शाळा, रुग्णालये आणि संशोधन संस्थांना उपकरणे आणि माहिती प्रदान करणे होता.

कालांतराने आण्विक तंत्रज्ञानाचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी केला जाऊ लागला आणि अण्वस्त्रांची क्षमता विकसित करण्यात युनायटेड स्टेट्स पहिल्या क्रमांकावर आहे आणि त्यानंतर माजी सोव्हिएत युनियन (रशिया) आणि चीन, यूके, भारत आहे. जागतिक शांततेला धोका निर्माण करणाऱ्या अनेक बेजबाबदार शक्तींचा समावेश आहे. हा धोका आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी यूएन अजेंडावर देखील होता आणि यूएन विविध करार आणि बंधने तयार करत आहेत. NPT, CTBT आणि इतर विविध करारांसारख्या

अण्वस्त्रांचा साठा मर्यादित आणि रद्द करण्यासाठी जबाबदार आहेत. याशिवाय अणु तंत्रज्ञानाच्या विकासापासूनच त्याच्या गैरवापराबाबत जागतिक स्तरावर जागरुकता निर्माण झाली आहे, त्यामुळे अण्वस्त्र तंत्रज्ञानाचे नियमन आणि नियंत्रण करण्यासाठी सर्वसमावेशक यंत्रणा स्थापन करण्याची गरज यूएनला वाटली.

**इंटरनॅशनल ऑटोनॉमिक एनर्जी एजन्सी (IAEA):**

यूएन छत्राखाली एक आंतरराष्ट्रीय संस्था १९५७ मध्ये तयार केली गेली जी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा एजन्सी (IAEA) म्हणून ओळखली जाते, त्याची उत्पत्ती १९५३ मध्ये संयुक्त राष्ट्रांमध्ये माजी अध्यक्ष आयझेनहॉवर यांच्या भाषणात आढळते. २९ जुलै १९५७ रोजी IAEA चा अधिकृत जन्म झाला.

जरी IAEA ची निर्मिती यूएन ने केली असली तरीही तिला स्वायत्त दर्जा आहे,यूएन कुटुंबात स्वतःचे स्थान आहे. IAEA ने कृषी, मानवी आरोग्य, उद्योग, पर्यावरण संरक्षण आणि इतर क्षेत्रातील अणुविज्ञान आणि तंत्रज्ञानाचे योगदान पुढे नेण्यासाठी यूएन च्या अनेक प्रमुख विकास संस्थांसोबत मजबूत सहकार्य व्यवस्था स्थापन केली.

**IAEA चे प्रमुख भागीदार**

अन्न आणि कृषी संघटना (FAO)

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनDP)

जागतिक आरोग्य संघटना (WHO)

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (यूएनEP)

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना (यूएनESCO)

संयुक्त राष्ट्र औद्योगिक विकास कार्यक्रम (यूएनIDO)

हे आहेत,याशिवाय, बहु-पक्षीय विकास बँका, द्विपक्षीय देणगीदार आणि गैर-सरकारी संस्थांसोबत सहकारी व्यवस्था विकसित करते.IAEA हे अण्वस्त्र तंत्रज्ञान आणि त्याच्या वादग्रस्त ॲप्लिकेशन्सशी मजबूतपणे जोडलेले आहे, एकतर शस्त्र म्हणून किंवा एक व्यावहारिक आणि उपयुक्त साधन म्हणून. सुरुवातीपासूनच, सुरक्षित आणि शांततापूर्ण आण्विक तंत्रज्ञानाचा प्रचार करण्यासाठी जगभरातील सदस्य राष्ट्रे आणि अनेक भागीदारांसोबत काम करण्याचा आदेश देण्यात आला होता. IAEA च्या दुहेरी मिशनची उद्दिष्टे- अणूला प्रोत्साहन देणे आणि नियंत्रित करणे हे IAEA च्या कलम II मध्ये परिभाषित केले आहे. IAEAजरी ही एक स्वतंत्र आंतरराष्ट्रीय संस्था असली तरी ती दरवर्षी यूएनGA ला अहवाल देते.

व्यापकपणे सांगायचे तर, IAEA अणुऊर्जेच्या सुरक्षित आणि शांततापूर्ण वापराला प्रोत्साहन देण्यासाठी जगभरातील १७१ सदस्य देश आणि अनेक भागीदारांसह कार्य करते. तांत्रिक सहकार्य कार्यक्रमांद्वारे IAEA त्याच्या सदस्यांना मदत करते आणि त्यांच्यामध्ये वैज्ञानिक आणि तांत्रिक माहितीच्या देवाणघेवाणीला प्रोत्साहन देते. त्याचे मुख्यालय व्हिएन्ना

(ऑस्ट्रिया) येथे असून जिनेव्हा, न्यूयॉर्क, टोरोंटो आणि टोकियो येथे प्रादेशिक कार्यालये आहेत. IAEA सदस्य राष्ट्रांमध्ये मजबूत आणि टिकाऊ जागतिक आण्विक सुरक्षा आणि सुरक्षा फ्रेमवर्कला प्रोत्साहन देते,रेडिएशनच्या हानिकारक प्रभावांपासून लोक, समाज आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी कार्य करते.

**IAEA ची रचना:**

IAEA खालीलप्रमाणे तीन अवयवांनी बनलेले आहे,

**अ] सर्वसाधारण परिषद:**

सर्वसाधारण परिषदेत सर्व सदस्य राष्ट्र असतात, प्रत्येकाला एक मत असते. त्याची वर्षातून एकदा IAEA मुख्यालयात बैठक होते. गव्हर्नर मंडळाच्या किंवा IAEA सदस्यांच्या बहुसंख्य सदस्यांच्या विनंतीनुसार डायरेक्टर-जनरलद्वारे विशेष सत्रे बोलावली जाऊ शकतात.

IAEA दोन वर्षांच्या कालावधीसाठी बोर्ड ऑफ गव्हर्नरच्या ३५ सदस्यांपैकी २२ सदस्यांची निवड करते. ते मंडळाच्या वार्षिक अहवालांचा विचार करते आणि संयुक्त राष्ट्रांना सादर करण्यासाठी अहवाल मंजूर करते आणि यूएन आणि इतर संस्थांशी करार करते. ते बोर्ड ऑफ गव्हर्नर किंवा कोणत्याही सदस्य राष्ट्राला शिफारस करू शकते.

**ब] प्रशासक मंडळ:**

३५ सदस्य मंडळ ऑफ गव्हर्नर्स ही एक संस्था आहे जीला प्रत्यक्षात एजन्सीची कार्ये पार पाडण्याचे अधिकार दिलेली आहे. मंडळाची साधारणपणे दरवर्षी पाच वेळा बैठक होते. ते खालीलप्रमाणे बनलेले आहे:

आउटगोइंग बोर्ड ऑफ गव्हर्नर्स अणुऊर्जेच्या तंत्रज्ञानामध्ये आणि स्त्रोत सामग्रीच्या उत्पादनामध्ये सर्वात प्रगत १३ सदस्य आणि अणुऊर्जेच्या तंत्रज्ञानामध्ये आणि स्त्रोत सामग्रीच्या उत्पादनामध्ये सर्वात प्रगत सदस्य सदस्यत्वासाठी नियुक्त करतात. सर्वसाधारण परिषद वेगवेगळ्या प्रदेशांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी बोर्ड ऑफ गव्हर्नरचे सदस्यत्व देखील निवडते.

**क] महासंचालक आणि सचिवालय:**

IAEA च्या कर्मचाऱ्यांचे नेतृत्व डायरेक्टर-जनरल करतात, ज्याची नियुक्ती चार वर्षांच्या कालावधीसाठी सर्वसाधारण परिषदेच्या मान्यतेने गव्हर्नर मंडळाद्वारे केली जाते.महासंचालकांचे एजन्सीचे मुख्य प्रशासकीय अधिकारी म्हणून वर्णन करते परंतु ते अधिकाराखाली आणि गव्हर्नर मंडळाच्या नियंत्रणाच्या अधीन राहतील अशी तरतूद करून त्यांच्या स्वतंत्र अधिकारांना जवळून मर्यादित करते. कर्मचाऱ्यांची नियुक्ती, संघटना आणि कामकाज यासाठी महासंचालक जबाबदार असतात.

**IAEA ची कार्ये:**

IAEA खालील महत्त्वाची कार्ये करते,

१. आण्विक तंत्रज्ञानाच्या शांततापूर्ण वापराच्या संशोधन, विकास आणि व्यावहारिक वापरास प्रोत्साहन देणे आणि मदत करणे.

२. IAEA द्वारे असे संशोधन/विकास इत्यादींचा लष्करी उद्देशासाठी वापर केला जाणार नाही याची खात्री करण्यासाठी सुरक्षा रक्षकांची स्थापना आणि प्रशासन करणे.

३. अण्वस्त्र अप्रसार करार आणि इतर आंतरराष्ट्रीय करारांतर्गत अर्ज करणे, अशा करारांना अण्वस्त्र नसलेल्या राज्यांमध्ये (NNWS) पक्षांमध्ये अनिवार्य सर्वसमावेशक सुरक्षा उपाय.

IAEA चे खालील तीन क्षेत्र आहेत:

१. सुरक्षितता आणि सुरक्षा

२. विज्ञान आणि तंत्रज्ञान

३. सुरक्षितता आणि पडताळणी

जरी IAEA NPT चा पक्ष नसला तरीही त्याच्या अंतर्गत प्रमुख जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. NPT अंतर्गत, IAEA ची आंतरराष्ट्रीय सुरक्षा निरीक्षक म्हणून आणि आण्विक तंत्रज्ञानाच्या शांततापूर्ण अनुप्रयोगांचे हस्तांतरण करण्यासाठी एक बहुपक्षीय चॅनेल म्हणून विशिष्ट भूमिका आहेत.

**IAEA च्या संबंधातील महत्त्वाचे कलमे**

NPT अनुच्छेद III- IAEA हे सत्यापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सुरक्षा उपायांचे व्यवस्थापन करते की NPT मध्ये अण्वस्त्र नसलेले राज्य पक्ष त्यांनी केलेल्या अप्रसार वचनबद्धतेची पूर्तता करतात, "अण्वस्त्र उर्जेचा शांततापूर्ण वापर करण्यापासून आण्विक शस्त्रे किंवा इतर अण्वस्त्रांकडे वळवण्यापासून रोखण्याच्या दृष्टिकोनातून.

NPT कलम IV- एजन्सी "शांततापूर्ण हेतूंसाठी, विशेषत: अण्वस्त्र नसलेल्या राज्यांच्या प्रदेशांमध्ये, गरजांचा योग्य विचार करून, अणुऊर्जेच्या अनुप्रयोगांचा पुढील विकास करण्याच्या उद्देशाने प्रयत्नांसाठी एक चॅनेल सुलभ करते आणि प्रदान करते.

एकंदरीतच अणुऊर्जेला सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजू आहेत. अणुऊर्जा ही संवेदनशील सामग्री आहे ज्याचा गैरवापर तर्कहीन देश किंवा गट किंवा संस्थांद्वारे केला जाऊ शकतो. राष्ट्र आणि मानवतेच्या सेवेच्या अभिनव उद्देशाने याचा शोध लावला गेला होता परंतु त्याचा नकारात्मक परिणाम १९४५ मध्ये हिरोशिमा आणि नागासाकी बॉम्बस्फोटात दिसून आला तेव्हापासून अणुऊर्जेचा गैरवापर रोखण्यासाठी आणि परावृत्त करण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरांवर आणि अधिकार्यांकडून प्रयत्न केले गेले. आण्विक तंत्रज्ञान सुरक्षित हातात हस्तांतरित करण्याच्या उद्देशाने आणि राष्ट्राच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी याचा इष्टतम वापर करण्याच्या उद्देशाने IAEA ची निर्मिती करण्यात आली.

IAEA आपले कार्य योग्यरित्या पार पाडण्यात यशस्वी ठरले आहे आणि स्थापनेपासून ते पारदर्शकपणे कार्य करते.

**सारांश:**

संपूर्ण प्रकरणामध्ये आपण चर्चा केल्याप्रमाणे, संयुक्त राष्ट्रसंघाचे मूलभूत तत्व जगात शांतता, सुरक्षा आणि सहकार्य राखणे आहे. हे विविध देशांमधील शांतता प्रक्रिया सुलभ करते; हे मध्यस्थी, संवाद, वाटाघाटी आणि जगातील शांतता पुनर्संचयित करण्यासाठी इतर शांततापूर्ण माध्यमांच्या आवारात कार्य करते. यासाठी युनायटेड नेशन्सकडे अनेक साधने आहेत जसे की आंतरराष्ट्रीय विवादांचे पॅसिफिक सेटलमेंट ज्याद्वारे देश असहमतीचा मुख्य मुद्दा समजून घेऊ शकतात आणि यूएन त्यांना शांततेने विल्हेवाट लावण्यास मदत करते. युद्धग्रस्त देशांमध्ये शांतता, सुव्यवस्था आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी पीसकीपिंग ऑपरेशन्स ही एक प्रभावी पद्धत आहे, संयुक्त राष्ट्रांनी अनेक शांतता मोहिमा राबवल्या आहेत त्यापैकी अनेक यशस्वी झाल्या आहेत, अनेक शांतता मोहिमा अजूनही सक्रिय आहेत आणि अनेक प्रदेशांमध्ये शांतता पुनर्संचयित करण्याचा प्रयत्न करत आहेत. अण्वस्त्र तंत्रज्ञान हा आणखी एक महत्त्वाचा आणि संवेदनशील मुद्दा आहे, विशेषत: दुसऱ्या महायुद्धात त्याचा वापर केल्यानंतर, म्हणून यूएन ने सुरक्षित हातात आण्विक तंत्रज्ञान हस्तांतरित करण्याच्या प्रकरणाकडे पाहण्यासाठी विशेष अवयव तयार केला आहे, तो अवयव IAEA म्हणून ओळखला जातो. त्याची निर्मिती झाल्यापासून IAEA अणु स्थळांच्या नियमित तपासणीत, अणु तंत्रज्ञानाचे रक्षण करण्यासाठी आणि मानवजातीच्या फायद्यासाठी त्याच्या हस्तांतरणासाठी सक्रिय आहे.लीग ऑफ नेशन्सने ज्या उद्देशाने कल्पना केली होती त्याच उद्देशाने संयुक्त राष्ट्रे अस्तित्वात आली परंतु तिच्या अपयशामुळे जागतिक शांतता आणि सुरक्षिततेसाठी आंतरराष्ट्रीय संघटना असण्याच्या व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.यूएन च्या निर्मितीनंतर आणि तिच्या यशस्वी कार्य करणाऱ्या जागतिक समुदायांनी विश्वास संपादन केला आणि विश्वास ठेवला की आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा  राखली जाऊ शकते परंतु युनायटेड नेशन्स युद्ध, आण्विक तंत्रज्ञानाचे बेकायदेशीर हस्तांतरण आणि शांतता राखणे या समस्यांना तोंड देत आहे त्यामुळे प्रासंगिकता आणि महत्त्व आज संयुक्त राष्ट्रांची महत्त्व वाढवली आहे.

**आपली प्रगती तपासा**

**१. इंटरनॅशनल ऑटोनॉमिक एनर्जी एजन्सीची भूमिका स्पष्ट करा.**

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

______________________________________________________________________

**संकल्पना परिभाषा**

यूएन –United Nations

CTBT- Comprehenisve Test Ban Treaty

NPT- Non-Prolifaration Treaty

Pacific Settlement of International Disputes and Peace Keeping Operations

**युनायटेड नेशन्स पीस किपिंग ऑपरेशन्स:**

IAEA:Regulation and control of Nuclear Technology: Role of International Atomic Energy Agency (IAEA)

**अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**

१. Charter of United Nations and statue of International Court of Justice, Department of Public Information. २०१६

२. United Nations Security Council and War: The evolution of thought and practice since १९४५.

३. The Oxford Handbook on the United Nations.

४. UN peacekeeping operations and the protection of civilians.

५. United Nations and global conflicts.

६. Scientific, Technical publications in the IAEA (iaea.org)

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

३

# संयुक्त राष्ट्र संघटना आणि समकालीन सामाजिक आर्थिक समस्या

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे
३.२ प्रास्ताविक
३.३ विषय विवेचन
 ३.४ .१ सहस्त्रक विकास ध्येय
 ३.४ .२ जागतिक आरोग्य संघटना
 ३.४ .३ अन्न आणि कृषी संघटना
३.५ संयुक्त राष्ट्र संघटनेचा विकास कार्यक्रम
 ३.५.१ सहशास्त्र विकास ध्येय
 ३.५.२ शाश्वत विकास ध्येय
३.६ संयुक्त राष्ट्र संघटनेचा पर्यावरण कार्यक्रम

## ३.१ उद्दिष्टे

संयुक्त राष्ट्र संघटना आणि समकालीन सामाजिक, आर्थिक समस्या अभ्यासातून आपणास पुढील उद्दिष्टे साध्य करता येतील.

१) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समन्वयक संस्थाची अभ्यासक विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

२) संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सहस्त्रक विकास ध्येय ची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.

३) शाश्वत विकास ध्येय ची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

४) जागतिक आरोग्य संघटनेच्या कार्यक्रमाची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

५) अन्य आणि कृषी आयोगाच्या कार्याची विद्यार्थ्यांना माहिती करून देणे.

६) आंतरराष्ट्रीय स्तरावर दारिद्र्य निर्मूलन विषयाची संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.

७) विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाची माहिती करून देणे.

## ३.२ प्रास्ताविक

जागतिक स्तरावर दारिद्र्य, आरोग्य आणि पर्यावरण या विषयी संयुक्त राष्ट्र संघटनेचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे. १९४५ पासूनच संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक शांतता प्रस्थापित करण्याबरोबरच मनुष्याला चांगले आरोग्य, शिक्षण, राहणीमान मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना आणि त्याच्या सलग्न संस्था ज्यामध्ये ILO, WHO, WTO, FAO, UNDP, UNDP, UNESCO, UNICEF, IMF या सर्व संस्था विशेषतः बालकाचे, महिलांचे अपंगाचे या सारख्या दुर्बल घटकाचे कल्याण साधण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेने दरवर्षी मानव विकास अहवाल सादर करून जगातील देशांमध्ये दारिद्र्य, शिक्षण, आयुर्मान या विषयी संपूर्ण माहिती जगासमोर आणण्याचे, तसेच अविकसित गरीब राष्ट्रांना त्याच्या राष्ट्रातील उपासमार, बालमृत्यू, कुपोषण अशा समस्या सोडवण्यासाठी जागतिक श्रीमंत विकसित देशांकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचे कार्य अनेक दशकापासून केले आहे. त्यापैकी संयुक्त राष्ट्र संघटनेचा विकास कार्यक्रम UNEP संयुक्त राष्ट्र संघटनेचा पर्यावरण कार्यक्रम UNEP हे कार्यक्रम राबवण्यात यश आले आहे.

## ३.३ विषय विवेचन

या घटकात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या जागतिक विकासासाठी नियोजित करण्यात आलेल्या सहस्त्रक विकास ध्येय MDG, शाश्वत विकास कार्यक्रम, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरण विकास कार्यक्रमा विषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तसेच जागतिक आरोग्याच्या अनुशंगाणे महत्वपूर्ण अशा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सहयोगी जागतिक आरोग्य संघटनेची रचना व कार्य नमूद करण्यात आली आहेत. जागतिक अन्न संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघटनेची सहयोगी अन्न आणि कृषी संघटनेची रचना व कार्य स्पष्ट करण्यात आली आहेत. या सर्व आंतरराष्ट्रीय संघटनांची जागतिक आरोग्य, अन्न संरक्षण, उपासमार समस्या सोडवणे, बाल आणि महिला सशक्तीकरण, कुपोषण थांबवणे यासाठी फार महत्वपूर्ण असे कार्य आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण अभ्यासताना विद्यार्थ्यांनी या आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास करणे आवशक आहे. म्हणूनच वरील सर्व मुद्द्यांचा समावेश या घटकात करण्यात आला आहे.

### ३.४.१ सहस्त्रक विकास ध्येय MDG (Millennium Development Goals) :-

संयुक्त राष्ट्र संघटनेने २०१५ पर्यंत सहस्त्रक विकास ध्येय MDG च्या माध्यमातून आठ ध्येय २१ लक्ष आणि ६० निर्दशक साध्य करण्याचे ठरवले होते. ही ध्येय पूर्ण करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने UNDP (United Nations Development Program ला समन्वयक संस्था म्हणून नियुक्ती केले होते. ही ८ ध्येय पूर्ण करण्यासाठी UNDP या संस्थेने सर्व सदस्य राष्ट्रांना मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्या आधारे भारत देशाने देखील ही ध्येय पूर्ण करण्याचा दृष्टीने पाऊल उचलले आहे त्यासाठी अनेक कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

संयुक्त राष्ट्र संघटनेने सांगितलेले MDG (Millennium Development Goals) खालील प्रमाणे आहेत

munotes.in

**१) दारिद्र्य व उपासमार निर्मूलन**

१.२५ डॉलर पेक्षा कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या लोकांचे प्रमाण १९९० च्या प्रमाणापेक्षा ५० टक्क्यावर (निम्म्यावर) आणणे

उपासमार होणाऱ्या लोकांचे प्रमाण १९९० च्या प्रमाणाच्या ५० टक्क्यावर (निम्म्यावर) आणणे.

विशेषतः स्त्रिया व तरुणांना बेरोजगार तसेच सर्व बेरोजगारांना पूर्ण रोजगार पुरवणे.

**२) वैश्विक प्राथमिक शिक्षण**

जागतिक पातळीवरील सर्व मुले तसेच मुलींचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्यासाठी प्रयत्न करणे.

**३) लैंगिक समानता व स्त्री सशक्तिकरण**

२००५ सालापर्यंत प्राथमिक आणि माध्यमिक शाळा मधील मुले आणि मुली मधील असामानता दूर करणे.

२०१५ सालापर्यंत शिक्षणाचा सर्व पातळीवरील असामानता दूर करणे.

**४) बाल मृत्यू दर कमी करणे.**

वय वर्ष ५ च्या आतील बालकांमधील बालमृत्यू दर १९९० च्या बालमृत्युदरपेक्षा दोन तृतीयांश (२/३) ने कमी करणे.

**५) माता आरोग्य सुधारणे.**

माता मृत्युदर १९९० सालच्या माता मृत्यूदरापेक्षा तीन चतुर्थांश (३/४) ने कमी करणे.

२०१५ सालापर्यंत प्रस्तुती आरोग्य सर्वापर्यंत पोहोचवणे.

**६) एड्स, मलेरिया आजारावर उपाय**

२०१० पर्यंत सर्व एड्सग्रस्तांवर उपचार होण्यासाठी प्रयत्न करणे.

२०१५ सालापर्यंत एड्स चे प्रमाण निम्म्यावर आणि २०१५ सालापर्यंत मलेरिया आजाराचे प्रमाण निम्म्यावर आणणे.

**७) पर्यावरण शाश्वतता टिकवणे.**

सर्व देशांनी शाश्वता विकासाच्या तत्त्वाचा अवलंब करणे.

पर्यावरण स्त्रोताचा होणारा ऱ्हास थांबवणे.

२०१० सालापर्यंत जैवविविधता संपुष्टात येण्याचा वेग कमी करणे.

२०१५ सालापर्यंत झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांचे प्रमाण कमी करणे.



munotes.in

८) **जागतिक विकासात भागीदारी**

शोषण रहित अर्थव्यवस्था निर्माण करणे.

देशांना कर्ज सुविधा देऊन आर्थिक सहाय्य करणे.

अविकसित देशांच्या आर्थिक प्रश्नासाठी मदत करणे.

विकसनशील देशांना औषध पर्याप्त दराने पुरवणे.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या UNEP कार्यक्रम अंतर्गत २०१५ पर्यंत MDG तर २०१५ ते २०३० या कालावधीमध्ये SDG (sustainable development goals) साध्य करण्याचे उद्दिष्टे ठरविण्यात आले आहे. सध्या संपूर्ण जग हे SDG साध्य करण्याचा प्रयत्न करत आहे.

### ३.४.२ जागतिक आरोग्य संघटना – WHO (World Health Organization) :-

जागतिक शांतता आणि सहकार्य वाढवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर २४ ऑगस्ट १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या काही प्रतिनिधिक संस्था म्हणून कार्य करतात. त्यामध्ये ILO ,FAO, UNESCO, WHO जागतिक आरोग्य संघटना ही एक संयुक्त राष्ट्र संघटनेची आंतरराष्ट्रीय आरोग्य विषयीची संस्था आहे. जागतिक आरोग्य संघटना जागतिक स्तरावरील आजाराचे निर्मूलन करायचे कार्य करत असते. या संघटनेचे मुख्यालय स्विझर्लंड देशातील जिनेव्हा या शहरात आहे. जागतिक आरोग्य संघटनेस संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांनी मान्यता दिली आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेची ही पहिली संघटना आहे, जिला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सर्व सदस्यांनी मान्यता दिली आहे. २०१९ मधील कोरोना व्हायरस मुळे जागतिक आरोग्य संघटनेचे महत्त्व फार वाढले आहे. कोरोना काळात जागतिक पातळीवर जागतिक आरोग्य संघटनेने घालून दिलेल्या नियमाचे पालन जगातील सर्वच राष्ट्रांनी केलेले आपण बघितले आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ७ एप्रिल १९४८ रोजी स्थापनेपासूनच उल्लेखनीय कार्य केले आहे. २०२१ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेचे १९४ देश सदस्य राष्ट्र होती. या सर्व राष्ट्रातील लोकांचे निरोगी व चांगले भविष्य घडवण्यासाठी ही संघटना प्रयत्नशील आहे. या संघटनेची स्थापना ७ एप्रिल १९४८ रोजी झाली असल्याकारणाने ७ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक आरोग्य संघटना विशेषतः महिला व बालकांना अग्रक्रम देते जागतिक पातळीवरील सर्व महिला आणि बालकाचे संबलीकरण करणे. हे या संस्थेचे महत्त्वपूर्ण कार्य आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध आरोग्य संघटनानमध्ये समन्वय साधने सर्व राष्ट्रांना मार्गदर्शन करून सर्व लोकांच्या आरोग्याची पातळी उंचावणे हे या संघटनेचे मुख्य ध्येय आहे.

**जागतिक आरोग्य संघटनाची कार्य :-**

१) विशिष्ट आरोग्याच्या विषयाकडे जगाचे लक्ष वळवणे यासाठी ७ एप्रिल हा जागतिक आरोग्य दिवस १९५० पासून साजरा केला जातो.

२) जागतिक पातळीवरील आरोग्याचे समस्यांचे उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न करणे. सुरुवातीच्या काळात WHO ने क्षयरोग आणि देवी या रोगांच्या निर्मूलनात

उल्लेखनीय कार्य केले. अलीकडे एड्स, कर्करोग यासारख्या रोगावर मात करण्याचे कार्य प्रगतीपथावर सुरू आहे.

३) जगातील सदस्य राष्ट्रांना आरोग्य विषयी मार्गदर्शन करणे. तसेच त्यांच्या कार्याची नोंद घेणे करुणाच्या काळात महाराष्ट्र शासनाने केलेल्या विशेषता मुंबईतील धारावी झोपडपट्टीतील दाट लोक वस्ती असलेल्या प्रदेशातील करुणा संसर्ग थांबवण्यात आलेल्या यशाची नोंद WHO ने घेतली होती.

४) महिला, बाल आरोग्य, पोषक आहार, पाणी स्वच्छता या सर्व क्षेत्रांमध्ये कार्य.

५) आजाराचे नियंत्रण व उपचारासाठी कार्य करणे.

६) सार्वजनिक आरोग्यासाठी जागतिक पातळीवर सर्वोच्च संस्था म्हणून कार्य.

७) मृत्युदर, अपंगत्व कमी करण्यासाठी मदत करणे.

८) गरीब अविकसित राष्ट्रांना आर्थिक सहाय्य करणे.

९) जागतिक पातळीवर मानवतावादी सहाय्य करण्याचे कार्य.

१०) प्रत्येक वर्षी आरोग्य विषयी थीम तयार करून संपूर्ण राष्ट्रांना आरोग्य विषयी जागृत करणे.

अशा प्रकारे जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेचीच एक संस्था म्हणून WHO ने आरोग्य क्षेत्रामध्ये गेल्या ७५ वर्षांमध्ये उल्लेखनीय कार्य केले आहे.

### ३.४.३. अन्न आणि कृषी संघटना – FAO (Food and Agriculture Organization) :-

आंतरराष्ट्रीय स्तरावर उपासमार नष्ट करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची ही एक संघटना म्हणून कार्य करते. १९४५ साली अन्न आणि कृषी संघटनेची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील उपासमार थांबवणे, किंवा पूर्णतः निर्मूलन करणे. हे या संघटनेचे मुख्य ध्येय आहे. जागतिक पातळीवर कृषी उत्पादनात वाढ करण्याबरोबरच पोषण आणि उच्च प्रतीचे आहार निर्माण करणे. जागतिक लोकसंख्येचे निरोगी आयुष्य निर्माण करण्यात या संघटनेचे मोठे योगदान आहे. अन्नसुरक्षा आणि पोषणासाठी १९९६ साली अन्न आणि कृषी संघटननेने जागतिक परिषदेचे आयोजन केले होते. अन्न आणि कृषी संघटनेने अन्न हक्क संबंधित आंतरराष्ट्रीय पातळीवरील सदस्य राष्ट्रासाठी काही मार्गदर्शक सूचना देखील केल्या आहेत. २०२२ मध्ये या संघटनेची १९४ एवढी सदस्य संख्या होती. रोम येथे या संघटनेचे मुख्यालय आहे.

**अन्न आणि कृषी संघटनेची कार्य :-**

१) जमीन आणि पाणी यांच्या वाढत्या मागणीमुळे त्यावर पर्याय तसेच जमीन व पाण्याचे संवर्धन करून शाश्वत विकासाला प्राधान्य देणे.

२) अन्नसुरक्षा आणि पोषणाचा दर्जा सुधारण्यास जागतिक पातळीवर प्रयत्न करणे.

३) सदस्य राष्ट्रांना पोषण आहार सुधारण्यासाठी मार्गदर्शन सूचना करणे.

४) आंतरराष्ट्रीय कृषी उत्पादन वाढण्यासाठी मदत करणे सुधारणा सुचवणे.

५) शाश्वत विकासास प्राधान्य देणे.

६) अन्न उत्पादन वाढवण्यावर अधिक भर देण्याचे कार्य ही संघटना करते.

अशा प्रकारे जागतिक उपासमार नष्ट करण्यासाठी अन्न उत्पादनात वाढ करणे. तसेच पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी जागतिक पातळीवर कार्य करणारी संयुक्त राष्ट्र संघटनेची अतिशय महत्त्वपूर्ण संघटना म्हणून अन्न व कृषी संघटना नावारूपाला आली आहे.

## ३.५. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम UNDP (United Nations Development Program)

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम ही संयुक्त राष्ट्र संघटनेची जागतिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची संघटना आहे. पूर्वीच्या संयुक्त राष्ट्र संघटनेचा विशेष निधी आणि EPTA (expanded program of technical assistance) या दोन्हीच्या एकत्रिकणातून UNDP ची १९६६ साली स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेचे अमेरिकेतील न्यूयार्क येथे मुख्यालय आहे. सध्या (२०२२ मध्ये) या संघटनेची १७० एवढी सदस्य संख्या आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक विकास साधण्यासाठी २००० ते २०१५ या कालावधीत जागतिक विकासासाठी सहत्रक विकास ध्येय MDG (millennium development goals) तसेच २०१५ ते २०३० या कालावधीत शाश्वत विकास ध्येय SDG (sustainable development goals) साध्य करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची UNDP ही संघटना समन्वयक म्हणून महत्त्वपूर्ण कार्य करत आहे.

**कार्य :-**

१) जागतिक शाश्वत विकास साध्य करणे.

२) दारिद्र्य निर्मूलनासाठी कार्य करणे.

३) जागतिक आपत्य वरील उपाय शोधणे.

४) देशांना ज्ञान आणि बदलासाठी मार्गदर्शन करणे.

५) जगातील गरीब देशाच्या राहणीमानात सुधारणा करणे.

६) २०१५ पर्यंत सहस्त्रक विकास साधने.

७) २०३० पर्यंत शाश्वत विकासाची ध्येय साध्य करणे.

८) सदस्य देशाच्या कौशल्य विकास तसेच नेतृत्वाच्या विकासासाठी सहाय्य करणे.

९) शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणे.

munotes.in

१०) पर्यावरण विकासासाठी प्रयत्न करणे.

११) संरचनात्मक सुधारणेत गती देणे.

शाश्वत विकास साधण्यासाठी २०१८ ते २०२१ या कालखंडात UNDP ने strategic plan तयार केला होता. या आधारे २०३० पर्यंत शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यात येणार आहेत.

### ३.५.१. सहस्त्रक विकास ध्येय MDG (Millennium Development Goals)

UNDP ने २००० ते २०१५ या कालावधीमध्ये दारिद्र्य निर्मूलन तसेच राहणीमान उंचावण्यासाठी आठ ध्येय आखली होती व ती पूर्ण करण्यासाठी पूर्ण प्रयत्न केला गेला. ती ध्येय खालील प्रमाणे आहेत.

१) दारिद्र्य व उपासमार निर्मूलन.

२) वैश्विक प्राथमिक शिक्षण.

३) लैंगिक समानता व स्त्री सक्षमीकरण.

४) बाल मृत्यूदर कमी करणे.

५) माता आरोग्य सुधारणे.

६) एड्स मलेरिया आजारावर उपाय.

७) पर्यावरण शाश्वतता टिकवणे.

८) जागतिक विकासात भागीदारी.

### ३.५.२ शाश्वत विकास ध्येय SDG- (sustainable development goals)

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम UNDP (United Nations Development Program) ने २०१५ ते २०३० या कालावधी मध्ये शाश्वत विकास ध्येय SDG- (sustainable development goals) साध्य करण्याचे ध्येय ठरवले आहे. ही १७ ध्येय साध्य करण्यात येणार आहेत ती खालील प्रमाणे आहेत.

१) जगातील सर्व प्रकारचे दारिद्र्य दूर करणे.

२) उपासमार दूर करणे, अन्नसुरक्षा प्राप्त करणे, पोषण वाढ करणे आणि शाश्वत शेतीस प्रोत्साहन देणे.

३) निरोगी जीवनाची खात्री देऊन सर्व वयातील व्यक्तीसाठी चांगल्या आरोग्य स्वास्थ्याची भावना निर्माण करणे.

४) समावेशक व न्याय असे दर्जेदार शिक्षण देऊन सर्वांना आयुष्यभर शिकता येईल अशा संधी निर्माण करणे.

५) लैंगिक समानता प्राप्त करणे आणि महिला व मुलींचे सखलीकरण करणे.

६) सर्वांसाठी पाणी आणि स्वच्छता उपलब्ध करणे आणि त्याचे शाश्वत नियोजन करणे.

७) सर्वांसाठी परवडण्यासारखी विश्वसनीय शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा उपलब्ध करणे.

८) निरंतर समावेशक व शाश्वत आर्थिक वाढीस प्रोत्साहन देऊन उत्पादन, रोजगार व सर्वांना चांगले काम पुरवणे.

९) सुयोग पायाभूत सुविधाची उभारणी करून समावेशक व शाश्वत औद्योगीकरण करणे आणि नाविन्यतेला प्रोत्साहन देणे.

१०) देशातील व देशा- देशांमधील असमानता कमी करणे.

११) शहरे व मानवी अधिवास समावेशक सुरक्षित लवचिक आणि शाश्वत करणे.

१२) शाश्वत उत्पादन व उपभोगाचा आकृतीबंध निर्माण करणे.

१३) पर्यावरण बदल व त्याचे परिणाम यावर तात्काळ कार्यवाही करणे.

१४) शाश्वत विकासासाठी समुद्र व सागरी साधनाचा शाश्वत वापर करणे व त्याचे जतन करणे.

१५) पर्यावरणाचे संरक्षण व पुनर्वसन करणे व शाश्वत वापरास प्रोत्साहन देणे वाळवंटीकरणास तोंड देणे जमिनीचे अवक्रम थांबवणे जैवविविधतेचा ऱ्हास थांबवणे.

१६) शाश्वत विकासासाठी शांतताप्रिय आणि समावेशक संस्था उभारणे सर्वांना न्याय पुरवणे संस्था प्रभावी जबाबदार व समावेशक बनवणे.

१७) शाश्वत विकासाच्या अंमलबजावणीस गती देणे आणि जागतिक भागीदारी प्रोत्साहन देणे.

वरील प्रमाणे १७ ध्येय १६९ लक्ष आणि २३१ निदर्शकामध्ये SDG विभागले गेलेले आहेत. हे SDG वर्ष २०३० पर्यंत संयुक्त राष्ट्र संघटनेचे ध्येय UNDP या संस्थेच्या माध्यमातून साध्य करण्यात येणार आहेत.

जगातील विविध घटकाचे समावेशन करण्याचे कार्य हे UNDP करते यामध्ये सामाजिक, आर्थिक, प्रादेशिक, पर्यावरणीय आणि वित्तीय समावेशनाचा समावेश होतो ती खालील प्रमाणे थोडक्यात सांगता येतील.

**१) सामाजिक समावेशन :-**

सामाजिक समावेशनामध्ये विविध घटक ज्यामध्ये अपंग, मागासवर्ग, बालके, स्त्रिया तसेच अल्पसंख्याक या दुर्बल घटकाचा विकास होणे आवश्यक असते. हे सामाजिक समावेशनाच्या माध्यमातून घडून आणले जाते. यासाठी प्रत्येक राष्ट्र सामाजिक न्यायाच्या योजना राबवत असतात.

**२) आर्थिक समावेशन :-**

सर्व घटकांना अर्थव्यवस्थेच्या प्रवाहात आणण्यासाठी काही भौतिक प्रयत्न केले जातात. त्यामध्ये दारिद्र्य निर्मूलन तसेच रोजगार निर्मितीच्या योजना यांच्या माध्यमातून जागतिक, राष्ट्रीय तसेच राज्य किंवा प्रांतीय स्तरावर विविध योजना राबविल्या जातात.

**३) पर्यावरणीय समावेशन :-**

इको फ्रेंडली विकास साधने तसेच पर्यावरणाच्या ऱ्हासाशिवाय आर्थिक विकास घडून आणण्याचा प्रयत्न केला जातो. यालाच शाश्वत विकास असे म्हटले जाते.

**४) वित्तीय समावेशन :-**

अर्थव्यवस्थेच्या प्रवाहात प्रत्येक घटकाला सामावून घेण्यासाठी वित्तीय समावेशन होणे आवश्यक असते. त्यासाठी राष्ट्रीय पातळीवर काही योजना राबवल्या जातात. जनधन योजना, मुद्रा योजना यासारख्या योजनेच्या माध्यमातून प्रत्यक्ष घटकाचे वित्तीय समावेशन घडून आणले जाते.

**५) मानव विकास अहवाल :-**

UNDP प्रत्येक वर्षी मानव विकास अहवाल सादर केला जातो त्यामध्ये तीन घटकांचा समावेश असतो.

१) दरडोई उत्पन्न

२) शिक्षण

३) आयुर्मान

अशा प्रकारे सार्वजन विकास साधण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या UNDP संस्थेच्या माध्यमातून जगातील सदस्य राष्ट्रांना मार्गदर्शन व आर्थिक सहाय्य करण्यात येते. त्यामुळे जागतिक विकासाच्या दृष्टीने UNDP चे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण असे आहे.

## ३.६. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम UNEP (United Nations Environment Program)

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या १९७२ च्या स्टॉकहोम परिषदत तयार करण्यात आलेल्या संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम UNEP जागतिक पातळीवरील पर्यावरण ऱ्हास सारख्या समस्या सोडवण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे. मागील काही दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अनेक करार करण्यात आले आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरण विषयाच्या विविध कार्यक्रमांमध्ये समन्वय साधण्याचे प्रमुख कार्य संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमचे आहे. या कार्यक्रमांतर्गत पुढील काही दशकांमध्ये अनेक करार घडवून आणण्यात आले आहेत. या कार्यक्रमांतर्गत विविध देशाच्या पर्यावरण



munotes.in

कार्यक्रमाबरोबरच काही बिगर शासकीय संस्थांना देखील या कार्यक्रमांतर्गत समावून घेण्यात आले आहे. जागतिक स्तरावर या कार्यक्रमाच्या पुढाकारातूनच अनेक पर्यावरण चळवळी विकसित झाल्या आहेत. १९४५ ते १९९० या कालावधीत शीतयुद्धामुळे पर्यावरण कार्यक्रमाला वेग आला नाही. परंतु १९९० नंतर शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर पर्यावरण समस्या विषयी संपूर्ण जगाचा समन्वय साधला जाऊ लागला. परंतु UNEP ला काही मर्यादित अधिकार असल्याकारणाने UNEP च्या काही समस्या निर्माण होऊन. पाहिजे तेवढ्या प्रमाणात हा कार्यक्रम यशस्वी होत नसला तरी देखील संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरण समस्या सोडवण्य विषयाचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यक्रम म्हणून ओळखला जातो. अठराव्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली पूर्वीच्या हातमागाची जागा आधुनिक यंत्रयुगाणे घेतल्यामुळे उत्पादनात झपाट्याने वाढ झाली. त्यामुळे लोकांच्या गरजांमध्ये वाढ होत गेली. त्याच प्रमाणात पर्यावरण समस्या निर्माण झाल्या या पर्यावरण समस्या सोडवण्यासाठी जगभर अनेक चळवळी उभ्या राहिल्या मानवी जीवनावर या पर्यावरण ऱ्हासाचा परिणाम जाणवू लागला. जमिनीचा पोत घसरू लागला. अल्प पर्जन्य, तेल गळती, किरणोत्सार अशा समस्या उद्भवू लागल्या कारणाने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पुढाकाराने अनेक पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या यातूनच UNEP चा उदय झाला

### १) मॅटरियल प्रोटोकॉल :-

१९८० च्या दशकात वाढत्या औद्योगिकीकरणामुळे विविध रसायने हवेत सोडल्या कारणाने आणि शीतकरण्याच्या वापरात झालेल्या वाढीमुळे क्लोरोफ्लोरो कार्बनचे उत्सर्जन वाढत असल्याकारणाने ओझोनच्या थरावर विपरीत परिणाम होऊन तो विरळ होत चालला आहे. ओझोन थर नष्ट झाल्यास सूर्याची अतिनील किरणे पृथ्वीवर पोहोचू शकतात व त्याचा विपरीत परिणाम मनुष्य जीवनावर होऊ शकतो. त्यामुळे या ओझोन थराच्या संरक्षणासाठी १९८७ साली हा करार करण्यात आला. या करारांवर १९९८ सालापर्यंत २२ देशांनी CFC (क्लोरोफ्लोरो कार्बन) चे उत्सर्जन ५० टक्क्यांनी कमी करणे. तर १९९० साली झालेल्या बदलानुसार ८१ देशांनी २०१६ पर्यंत CFC चे उत्सर्जन संपूर्ण आटोक्यात आणण्याचे उद्दिष्टाने ठेवण्यात आले होते. या करारावर १९६ देशांनी सह्या करून त्याची अंमलबजावणी करण्यास मान्यता दिली होती.

### २) रिओ परिषद :-

१९९२ साली ब्राझील देशातील रियो या शहरांमध्ये वसुंधरा परिषद भरवण्यात आली. या परिषदेत १०० पेक्षा जास्त देशांचे राष्ट्रप्रमुख उपस्थित होते. जगातील सर्व देशांचा विकास हा शास्वत आर्थिक विकास असावा. या विषयी या परिषदेत चर्चा करण्यात आली. या परिषदेत UNFCCC (united Nations framework conversation on climate change) हा महत्त्वपूर्ण करार करण्यात आला. हरितगृह वायूचे उत्सर्जन कमी करणे आणि जागतिक तापमान वाढ कमी करणे. हे प्रमुख उद्दिष्ट होते. या अंतर्गत जगातील देशाचे विकसित आणि अविकसित राष्ट्र अशा गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले. त्या आधारे त्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या या करारा अंतर्गत स्थापन

केलेल्या आयोगांना विशेष अधिकार नव्हते. त्याचबरोबर राष्ट्राचे सार्वभौमत्व सर्वोच्च असल्याकारणाने हा करार चांगल्या प्रकारे यशस्वी होऊ शकला नाही.

### ३) क्योटो प्रोटोकॉल

१९९७ साली जपान मधील क्योटो या शहरात जागतिक तापमान वाढ विषयी हा करार करण्यात आला म्हणून या कराराला क्योटो प्रोटोकॉल म्हणून ओळखले जाते. जागतिक तापमान वाढ कमी करण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण करार म्हणून ओळखला जातो. हा UNCCC च्या अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा आहे. जागतिक कार्बन उत्सर्जन कमी करण्या विषयाचा हा करार होता. यातून कार्बन क्रेडिट ही संकल्पना पुढे आली. या आधारे व्यापार पद्धतीने धोरण ठरवण्याची परवानगी देण्यात आली. या करारानुसार १९९० सालच्या हरितगृह उत्सर्जनाच्या सरासरी २ % कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे ध्येय ठरवण्यात आले.

### ४) कोपनहेगन परिषद :-

डेन्मार्क देशाची राजधानी कोपनहेगन येथे २००९ साली संयुक्त राष्ट्रसंघाची वातावरण बदला विषयाची परिषद भरवण्यात आली होती. २००५ ते २०१२ पर्यंत क्योटो प्रोटोकॉल ची अंमलबजावणी करण्याचा कालावधी होता. त्यानंतर वातावरण बदल विषयी काय रणनीती असावी याविषयी २०१२ नंतरच्या वातावरणीय बदला विषयाचा आराखडा तयार करण्याविषय या परिषदेत चर्चा करण्यात आली. सर्व राष्ट्रांनी तापमान वाढ दोन अंश सेल्सियस पेक्षा जास्त होणार नाही. याची काळजी घेण्याचे ठरवण्यात आले. या करारामध्ये काही विकसनशील देशांनी ज्यामध्ये भारत, चीन, दक्षिण आफ्रिका या देशाचा विकास अद्याप पूर्ण झालेला नाही. तसेच कार्बन उत्सर्जन दरडोई मोजले जाऊ नये असा युक्तिवाद केला त्यामुळे करार पूर्ण यशस्वी होऊ शकला नाही.

### ५) पॅरिस करार :-

फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे २०१५ साली हरितगृह वायु उत्सर्जन कमी करण्याविषयी तसेच अविकसित देशांसाठी काही आर्थिक मदतीची तरतूद करण्या विषयाचा हा करार होता. या परिषदेत १९६ सदस्य राष्ट्रांनी सहभाग घेतला होता. पॅरिस करार हा क्योटो प्रोटोकॉलला पर्याय होता. २०२० पर्यंत क्योटो करार आणि त्यानंतर पॅरिस करार लागू होणार आहे. पॅरिस परिषदेला COP-२१ म्हणूनही ओळखले जाते. औद्योगिक क्रांती पूर्वीच्या तापमानापेक्षा दोन अंश सेल्सिअस पेक्षा जास्त तापमान वाढवून न देणे उद्दिष्टे ठरवण्यात आले आहे. त्यासाठी प्रत्येक राष्ट्रांनी तापमाण वाढ कमी करणे विषयी काही ध्येय ठरवली आहेत.उदा. फ्रान्स या देशाने २०३० सालापर्यंत पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनाची विक्री थांबवण्याचे उद्दिष्ट ठरवले आहे. तर भारताने हे धोरण २०४० पर्यंत अमलात आणायचे ठरवले आहे.

## सारांश

संयुक्त राष्ट्र संघटना आणि समकालीन सामाजिक आर्थिक समस्या पाहता त्यामध्ये प्रामुख्याने दारिद्र्य, शिक्षण, गरिबी, आरोग्य हे प्रश्न जागतिक स्तरावर प्रत्येक देशामध्ये विकासामध्ये असमतोलपणा निर्माण करतात.सहस्त्रक विकास ध्येय,जागतिक आरोग्य संघटना,संयुक्त राष्ट्र  विकास कार्यक्रमातंर्गत संयुक्त राष्ट्र संघटना सामाजिक आर्थिक समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसून येते.

## आपली प्रगती तपासा

१) जागतिक आरोग्य संघटनेची कार्य  स्पष्ट करा.

______________________________________________________________

२) सहस्त्रक विकास ध्येय लिहा.

______________________________________________________________

३) संयुक्त राष्ट्र संघटनेचा पर्यावरण कार्यक्रम स्पष्ट करा.

______________________________________________________________

४) संयुक्त राष्ट्र संघटनेची शाश्वत विकास ध्येय लिहा.

______________________________________________________________

munotes.in

**अधिक वाचण्यासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ सूची**

१) आंतरराष्ट्रीय संबंध - -अरुणा पेंडसे उत्तरा सहस्त्रबुद्धे.

२) समकालीन जागतिक राजकारण – डॉ. शेलेन्द्र देवळाणकर.

३) आंतरराष्ट्रीय संबंध – पियु घोष.

४) आंतरराष्ट्रीय संबंधाचे सिद्धांत- डॉ. प्रशांत अमृतकर

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

# ४

# आंतरराष्ट्रीय आर्थिक संघटना

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ आर्थिक सहकार्य आणि विकास संघटना (OECD-Organisation for Economic Co-operation & Development)

४.४ पेट्रोल निर्यातदार राष्ट्रांची संघटना COPEC – Organisation of Petroleum Exporting Countries)

४.५. विद्यापीठीय प्रश्न

## ४.१ उद्दिष्टे

१) आंतरराष्ट्रीय राजकारणात कार्यरत असणाऱ्या OECD आणि OPEC या संघानांची माहिती घेणे.

२) OECD संघटनेची उद्दिष्टे, रचना, भूमिका आणि कार्ये समजून घेणे.

३) OPEC संघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी, उद्दिष्टे, रचना, वाटचाल समजून घेणे.

## ४.२ प्रस्तावना

आज जगातील सार्वभौम राष्ट्रे पररस्परांच्या सहकार्यातून आपला विकास साधत आहे. प्रत्येक देशाची काही निश्चित उद्दिष्टे असतात. ही उद्दिष्टे आर्थिक-राजकीय स्वरुपाची असतात. उदा. व्यापारी सवलती मिळविणे, कर्ज उभारणी करणे ही आर्थिक स्वरुपाची तर एखादा भूमाग मिळवणे, शेजारील राष्ट्राबरोबर सीमारेषा अधोरेखित करून घेणे ही राजकीय उदिष्टे असू शकतात. राष्ट्रे ही उद्दिष्टे संघर्ष आणि सहकार्याच्या मार्गाने साध्य केली जातात.

राष्ट्रे सहकार्याच्या माध्यमातून समान उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी बहुपक्षीय पातळीवर एकत्र येऊन करार करतात. अशा बहुपक्षीय सहकार्यातून प्रादेशिक - आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध प्रकारच्या समान संघटना निर्माण होतात. या संघटनांच्या माध्यमातून राष्ट्रे परस्पर चर्चा, सहकार्य, शांततेच्या मार्गाने विकास साधण्याचा प्रयत्न करतात.

आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रादेशिक विभागीय, विश्व पातळीवर विविध संघटनांची निर्मिती करण्यात आलेल्या आहेत. उदा. विश्व व्यापार संघटना (WTO), सार्क, आसियान इ.

प्रस्तुत प्रकरणात आपण OECD, आणि प्रशांत महासागरातील तेल उत्पादक राष्ट्रांनी स्थापन केलेल्या OPEC या संघटनांचा अभ्यास करणार आहोत. या संघटना विभागीय पातळीवर स्थापन करून त्यांनी आपापल्या सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक विकासात मोलाची

munotes.in

भूमिका निभावली आहे. तसेच विभागीय आणि जागतिक पातळीवर परस्पर सहकार्याचे एक चांगले व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

## ४.३ OECD- Organisation for Economic Co-operation & Development - आर्थिक सहकार्य आणि विकास संघटना

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री जॉर्ज मार्शल यांनी ५ जून, १९४७ ला युरोपीय राष्ट्रांना आर्थिक मदत पुरविण्यासाठी एका योजनेची घोषणा केली, जिला मार्शल योजना असे म्हटले जाते. १९४७ च्या ट्रुमन तत्वाप्रमाणे मार्शल योजनेचा उद्देशदेखील दुसऱ्या महायुद्धानंतर विविध आर्थिक समस्यांशी झुंझत असणाऱ्या युरोपियन राष्ट्रांना आर्थिक मदत करण्याचा होता. मार्शल योजनेच्या प्रस्तावावर विचारविनिमय करण्यासाठी पॅरिस येथे युरोपीय देशांची एक परिषद भरली. या परिषदेत युरोपियन राष्ट्रांची आर्थिक सहकार्य संघटना (Organisation for European Economic Co-operation) ची स्थापना करण्यात आली. 30 सप्टेंबर, १९६१ रोजी तिचे नाव बदलून आर्थिक सहकार्य आणि विकास संघटना (Organisation for Economic Co-operation & Development-OECD) असे करण्यात आले.

OECD ही त्या प्रगत राष्ट्रांची संघटना आहे, जी प्रातिनिधिक लोकशाही तत्वे आणि मुक्त व्यापार वित्त व्यवस्था यांचा स्वीकार करतात. सद्यपरिस्थितीत OECD चे 30 पूर्ण सदस्य आहेत.

**४.३.१ मुख्यालय -** OECD चे मुख्यालय फ्रान्समधील पॅरिस येथे आहे.

### ४.३.२ उद्दिष्टे -

१) सदस्य राष्ट्रांमधील कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रीकरण घडवून आणणे

२) सदस्य राष्ट्रांना आपल्या अर्थव्यवस्थांमध्ये कल्याणकारी योजना राबविण्यास प्रोत्साहन देणे.

३) सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक विकास व वाढीसाठी मदत करणे आणि सदस्य राष्ट्रातील नागरिकांचा राहणीमानाचा दर्जा उंचावणे

४) संघटनेच्या धोरणांमध्ये समन्वय साधने

५) विश्व अर्थव्यवस्थेत समतोल राखणे तसेच चिरंतर विकासाचे ध्येय साधण्यासाठी सदस्य राष्ट्रांना प्रोत्साहन देणे.

६) जगातील विकासाच्या मार्गावर असलेल्या राष्ट्रांना आर्थिक विकासासाठी मदत करणे

७) जागतिक व्यापारात वाढ करणे तसेच आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे

### ४.३.२ OECD ची रचना

प्रामुख्याने OECD चे तीन मुख्य अंग आहे

१) परिषद (Council)

२) कार्यकारी समिती (Executive Committee)

३) सचिवालय (Secretariat)



munotes.in

OECD

परिषद कार्यकारी समिती सचिवालय

याशिवाय दैनंदिन कामकाजात मदत म्हणून काही सहाय्यकारी यंत्रणादेखील अस्तित्वात आहे.

**१) परिषद (council)**

परिषद हे OECD चे मुख्य अंग मानले जाते. सर्वसाधारणपणे परिषदेत प्रत्येक सदस्यराष्ट्रांचा एक प्रतिनिधी असतो. परिषदेची सर्वसाधारण बैठक वर्षातून एकदा बोलाविली जाते. या मध्ये सदस्यराष्ट्राचे मंत्री सहभागी होतात. तसेच महिन्यातून दोनदा कायमस्वरूपी प्रतिनिधी जसे राष्ट्रीय प्रतिनिधी मंडळ भेटतात. परिषदेमध्ये OECD ची धोरणे. ठरविली जातात तसेच काही महत्वपूर्ण निर्णय घेतले जातात. परिषदेमार्फत आर्थिक विकासाच्या संदर्भात विभिन्न कार्याची रूपरेषा आखून दिली जाते.

**२) कार्यकारी समिती –**

OECD ने परिषदेत ठरविलेल्या धोरणांची अंमलबजावणी कार्यकारी समिती करते.

**३) सचिवालय -**

OECD चे मुख्य प्रशासनविषयक कामकाज सचिवालयामार्फत चालविले जाते. महासंचालक हा सचिवालयाचा मुख्य प्रशासकीय अधिकारी असतो. महासंचालक हा परिषदेने घेतलेल्या सर्व निर्णयासंबंधी जबाबदार धरला जातो OECD चे वार्षिक अंदाजपत्रक आणि पूरक अंदाजपत्रक दरवर्षी तो परिषदेतील एका विशिष्ट समितीला सादर करतो. सचिवालयाकडून विविध संचालकांची निवड केली जाते.

याशिवाय OECD च्या कार्यात काही मदत करण्यासाठी काही विशेष समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. जसे उदा.

१) Centre for Educational Research & Innovation CERI

जिचे कार्य म्हणजे सदस्य राष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेत सुधारणा घडवून आणणे

२) Nuclear Energy Agency- NEA - अणुऊर्जेचा शांततापूर्ण – विकास

३) Centre for Co-operation with European Economies in Transition - CCET - मध्य आणि पूर्व युरोपियन राष्ट्रांतील लोकशाहीचा विकास घडवणे आणि बाजाराभिमुख व्यवस्थेची उभारणी करणे.

### ४.३.३ OECD ची भूमिका-कार्य:-

OECD चे मुख्य कार्य म्हणजे सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक धोरणांचे सतत परीक्षण करणे आणि आवश्यक त्या उपाययोजना सुचविणे. त्याचप्रमाणे OECD व्यापारातील असमतोल स्थिर करण्यासाठी आस्थिर चलनव्यवस्थेला विरोध करते.

OECD या संघटनेचे सदस्य नसलेल्या राष्ट्रांशीही सलोख्याचे संबंध प्रस्थापित झाले आहे. हे संबंध दृढ करण्याचे कार्य सन १९८८ मध्ये स्थापन झालेल्या Centre for Co-operation with Non- members (CCNM) या यंत्रणेच्या माध्यमातून केले जाते. या CCNM चे प्रमुख कार्य म्हणजे OECD आणि बिगर सदस्य राष्ट्रामध्ये विकासकार्यासंबंधी चर्चा, विचारविनिमय घडवून आणणे तसेच CCNM द्वारे बहुराष्ट्रीय, प्रादेशिक, राष्ट्रीय पातळीवर विविध कार्यक्रम राबवले जातात. या कार्यक्रमातून विशिष्ट राष्ट्रांना भेडसावणाऱ्या सामान्य समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या उपाययोजनां यावर भर देण्यात येतो.

त्याचप्रमाणे OECD च्या वतीने विशिष्ट खंडाचा विकास करण्यासाठी विकासात्मक उपाययोजना आखल्या जातात. जसे उदा. The Emerging Asia Programme, The Transition Economy programme (TEP).

दरवर्षी OECD विकासासंबंधी विविध परिषदा, चर्चासत्रांचे आयोजन करते. त्या चर्चासत्रांमध्ये चर्चिल्या गेलेल्या मुद्द्यांवर काही प्रकाशने प्रकाशित केले जातात. OECD ने आतापर्यंत आर्थिक विकासासंबंधी विविध क्षेत्रात समन्वयकाची भूमिका बजावली आहे. जसे उदा. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियम ठरविणे, भांडवली चववळ, विकसनशील राज्यांना माहिती-तंत्रज्ञानासंबंधी मदत, आर्थिक धोरणे, ऊर्जा, विकासात्मक सहकार्य, आंतरराष्ट्रीय व्यापार, वित्तीय संबंध, चिरकालीन विकास, विज्ञान-तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, रोजगार, कामगार कल्याण व इतर सामाजिक प्रश्न या संबंधी माहिती OECD गोळा करते आणि त्यावर आधारित विकासात्मक योजनांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करते. यासंदर्भात दरवर्षी 300 नवीन प्रकाशने प्रकाशित केले जातात आणि हे प्रकाशन आर्थिक-सामाजिक प्रश्नांसंबंधी माहितीचा महत्त्वपूर्ण स्त्रोत ठरते.

त्याचप्रमाणे OECD चे इतर विविध आंतरराष्ट्रीय संघटनांशी कार्यालयीन संबंध आहेत. जसे उदा. International Labour organisation, Food & Agriculture organisation, IMF, World Bank, आणि UNO शी संबंधित इतर संघटना. बयाचदा OECD International Transport Forum शी विकासकार्यासंबंधी समन्वय साधते.

## ४.४ OPEC (Organisation of Petroleum Exporting Countries)

सद्यास्थितीत आपल्या दैनंदिन जीवनातील खनिज तेलांची गरज आणि दिवसेंदिवस खनिजतेलांचे वाढत चाललेले भाव यावरून खनिजतेलाचे महत्व लक्षात येईल. अमेरिका-इराक युद्धामागचे मूळ कारण खनिजतेल हेच होते. सध्या जगाची आर्थिक समीकरणे बदलण्याची शक्ती खनिजतेलात आहे. म्हणून जगात ज्या राष्ट्रांकडे खनिज तेलाचा साठा विपुल प्रमाणात आहे किंवा जे राष्ट्र त्याच्या उत्पादन व विक्रीवर नियंत्रण ठेवू शकेल ते राष्ट्र जगावर आर्थिक सत्ता गाजवू शकेल अशी परिस्थिती आहे. म्हणूनच अमेरिकेने अण्वस्त्रे आणि

जैविक शस्त्रास्त्रांचे कारण दाखवून इराकवर हल्ला केला. कारण इराकमध्ये विपुल प्रमाणात ही खनिज संपत्ती आहे.

पेट्रोल-डिझेलसारख्या इंधनांचे महत्व व किंमत या बाबी दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. आणि त्याचबरोबर भूगर्भात असलेला त्यांचा साठा कमी होत चालला आहे. वैज्ञानिक प्रगतीत मानव अत्युच्च शिखरावर असला तरी आजपर्यंत विज्ञानाने नैसर्गिक खनिज संपत्तीला योग्य पर्याय दिलेला नाही. पेट्रोलचे हे महत्व त्याची निर्यात करणाऱ्या राष्ट्रांनी काही दशकांपूर्वीच ओळखले होते आणि त्यामुळेच OPEC सारखी संघटना अस्तित्वात आली.

### ४.४.१ OPEC

OPEC हे खनिजतेल उत्पादक देशांचे कार्टेल आहे. उत्पादनाची किंमत आणि पुरवठा नियंत्रित करणाऱ्या उत्पादकांच्या संघटनेला कार्टेल असे म्हणतात. उत्पादक राष्ट्रे एकत्रित येऊन, आपापसातील स्पर्धा संपवून, किमती नियंत्रित करतात. उत्पादनही नियंत्रित करून नफा वाढवितात. उत्पादकांचे कार्टेल असल्यास ग्राहकांचा तोटा होता.

### ४.४.२. OPEC ची स्थापना

सप्टेंबर, १९६० रोजी इराक, इराण, सौदी अरेबिया, कुवेत आणि व्हेनेझुएला या पाच राष्ट्रांनी मिळून OPEC या संघटनेची स्थापना बगदाद (इराक) येथे केली. १९७५ पर्यंत कतार, इंडोनेशिया, लिबिया, संयुक्त अरब अमिराती, आल्जेरिया, नायजेरिया, इक्वेडोर गॅबन या राष्ट्रांनी OPEC चे सदस्यत्व स्वीकारले. १९९२ मध्ये इक्वेडोरने तर १९९५ मध्ये गॅबनने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. २००७ मध्ये इक्वेडोरने पुन्हा प्रवेश केला. त्यामुळे सध्या OPEC ची सदस्यसंख्या ११ आहे. तसेच अंगोला व सुदान यांनी सदस्यत्व मिळविण्यात उत्सुकता दर्शवली आहे.

### ४.४.३ OPEC ची उद्दिष्टे

१) पेट्रोलियम पदार्थाची निर्यात करणाऱ्या देशांच्या धोरणात एकता, एकसूत्रीपणा आणणे.

२) सदस्य राष्ट्रांच्या हिताचे रक्षण करणे.

३) तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती नियंत्रित करणे.

४) पेट्रोलियम, क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उद्योजकांचे आर्थिक हितरक्षण करणे.

५) पेट्रोलियम पदार्थांची आयात करणाऱ्या देशांना योग्य दरात व नियमित पेट्रोल पुरवण्याची हमी देणे.

### ४.४.४ OPEC चे मुख्यालय

OPEC मुख्यालय व्हियन्ना (ऑस्ट्रिया) येथे आहे.

### ४.४.५ OPEC ची रचना -

OPEC

| संस्था-परिषद (Conference) | संचालक मंडळ (Board of Governors) | सचिवालय (Secretariat) |
|---|---|---|

**१) संस्था-परिषद (conference)**

OPEC ची ध्येयधोरणे सर्वोच्च संस्था परिषद - Conference कडून ठरवली जातात. या परिषदेचे प्रतिनिधी सर्वसामान्यतः सदस्य राष्ट्रांचे तेलमंत्री असतात. या प्रतिनिधींची बैठक वर्षातून दोनदा पार पडते. त्या बैठकीत धोरणांचा आराखडा ठरविणे, अंदाजपत्रकाला मंजुरी देणे, संचालक मंडळाची शिफारस करणे इ. कार्य केली जातात . या conference मधील प्रत्येक सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींना Governors असे म्हटले जाते.

**२) Board of Governors :**

सर्वोच्च संस्था परिषदेच्या Governors कडून Board of Governors चा अध्यक्ष निवडला जातो. त्यामुळे Board of Governor चे सर्व निर्णय एकमताने संमत व्हावे लागतात. वर्षातून किमान दोन वेळा Board of Governor ची बैठक बोलवण्यात येते.

**३) Secretariat**

OPEC च्या मुख्यालयात मुख्यालयाचा एक प्रमुख म्हणून एक सरचिटणीस व उपसरचिटणीस नेमण्यात येतो.

१९७६ मध्ये विकसनशील देशांना मदत देण्यासाठी म्हणून 'OPEC निधी' उभारण्यात आला होता. पण नंतर इ.स. १९८० पासून या निधीचे रूपांतर स्थायी OPEC निधीमध्ये करण्यात आले असून, त्याचा उपयोग आंतरराष्ट्रीय विकासाकरीता करण्यात येतो.

### ४.४.६ OPEC ची वाटचाल –

१९६० पूर्वी सात ब्रिटिश आणि अमेरिकन तेल कंपन्यांच्या कार्टेलच्या ताब्यात तेलाची बाजारपेठ होती. स्थापनेनंतर पहिली काही वर्षे या कार्टेलला विशेष यश मिळाले नाही. परंतु १९६० च्या दशकानंतर OPEC च्या सदस्यराष्ट्रांनी राष्ट्रीय उत्पन्नाचे साधन म्हणून तेलाची निर्यात केली. परंतु १९७० च्या सुमारास जागतिक पातळीवरील तेलाच्या किमती वाढल्या. या सर्वाचा फायदा घेऊन OPEC राष्ट्रांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात पैसे कमावले. संघटनशक्तीचा फायदा घेऊन सदस्य राष्ट्रांच्या आर्थिक हिताची धोरणे राबविण्यात आली.

munotes.in

१९७३ च्या अरब - इस्त्रायल युद्धानंतर या युद्धात इस्त्रायलला पाठिंबा देणाऱ्या देशांना OPEC ने तेल पुरवणे थांबवले. परिणामी तेलाची निर्यात ५०% ने घटली. तेलाच्या किमतीही महागल्या. यालाच १९७३ चा oil Shock म्हणतात. विकसित देशाबरोबर तेलनिर्यात करणाऱ्या तिसऱ्या जगातील गरीब देशांच्या अर्थव्यवस्थाही या oil shock मध्ये भरडल्या गेल्या. याचा परिणाम म्हणून तेलाचा जपून वापर करणे, पर्यायी ऊर्जास्त्रोतांकडे वळणे, असे उपाय योजण्यात आले. परिणामी OPEC देशाबाहेरील तेलउत्पादनात वाढ झाली.

भविष्यकाळात मध्य आशियातील देशांच्या तेलाच्या उत्पादनामुळे परिस्थितीत परिणामकारक बदल घडू शकतो. तेल उत्पादनाच्या तंत्रज्ञानात गेल्या २० वर्षात लक्षणीय सुधारणा घडून आल्यामुळे OPEL बाहेरील देशांचे उत्पादनही वाढले आहे.

सद्यस्थितीत OPEC राष्ट्रांचे तेल उत्पादन जगाच्या एकूण तेल उत्पादनाच्या ४०% एवढे आहे. त्यामुळे OPEC राष्ट्रांचे तेलाच्या किमतीवर नियंत्रण असले तरी त्यास सर्वतोपरी तेच जबाबदार नाहीत. एकूणच खनिज तेलाचा तुटवडा ही जागतिक समस्या बनत चालली आहे.

अमेरिकेच्या आखातातील धोरणावर आणि भूमिकेवर आखातातील राजकीय परिस्थिती कशी असेल, हे ठरते. त्यामुळे साहाजिकच OPEC ची भूमिकाही अमेरिकेच्या भूमिकेवरून ठरते. जागतिक अर्थव्यवस्थाही बऱ्याच प्रमाणात तेलावर अवलंबून आहे. म्हणूनच OPEC च्या सदस्य राष्ट्रांकडून 'तेलाचा' राजकीय हत्यार म्हणून वापर होतो.

## ४.५. विद्यापीठीय प्रश्न :

१) OECD या संघटनेची उद्दिष्टे, रचना, भूमिका व कार्ये स्पष्ट करा.

२) ओपेक संघटनेची पार्श्वभूमी, वाटचालीची चर्चा करा.

**संदर्भग्रंथ**

१) International organisations: conferences & Treaties, Spectrum Publication

❄❄❄❄❄❄❄

munotes.in